॥ श्री विठ्ठल प्रसन्न ॥

# * श्रीनामदेव. *

## महाराजांचें काव्यमय चरित्र.

जयें अतुल भक्तिच्या सुदृढ निश्चयाच्या बळें ॥
प्रसन्न करुनि हरी सकल तत्पदीं वाहिलें ॥
स्वयें तरुनि तारिलें कितिक पातकी दुर्मती ॥
प्रणाम शिरसा तया सतत **नामदेवाप्रती** ॥ १ ॥

---

लेखक
ह. भ. प. देवीदास लक्ष्मण महाजन. नांदेड.

---

प्रकाशक
विठ्ठल लक्ष्मण सुबंध
प्रोप्रायटर " नामदेव प्रेस " ११७० मन स्ट्रीट, पुणे.

---

मुद्रक
केशवराव रावजी गोंधळेकर, ' जगद्धितेच्छु प्रेस '
शनवार पेठ ५०७, पुणें.

---

[ सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन. ]

---

आवृत्ति पहिली.

---

आषाढ शके १८४६

---

किंमत ५ आणे.

REFBK-0002568

॥ श्री विठ्ठल प्रसन्न ॥

# * श्रीनामदेव.

## महाराजांचें काव्यमय चरित्र.

जयें अतुल भक्तिच्या सुदृढ निश्चयाच्या बळें ॥
प्रसन्न करुनि हरी सकल तत्पदीं वाहिलें ॥
स्वयें तरुनि तारिलें कितिक पातकी दुर्मती ॥
प्रणाम शिरसा तया सतत **नामदेवाप्रती** ॥ १ ॥

लेखक

ह. भ. प. देवीदास लक्ष्मण महाजन, नांदेड.

प्रकाशक

विठ्ठल लक्ष्मण सुबंध,
प्रोप्रायटर "नामदेव प्रेस" ११७० मेन स्ट्रीट, पुणें.

मुद्रक

केशवराव रावजी गोंधळेकर, 'जगद्धितेच्छु प्रेस'
शनवार पेठ ५०७, पुणें.

[ सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन. ]

आवृत्ति पहिली.

शके १८४६ जुलै १९२४.

किंमत ५ आणे.

REFBK-0002838

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
नं. २८३८

# अनुक्रमणिका.

पृष्ठ.


| | |
|---|---|
| अर्पणपत्रिका. | |
| परिशिष्ट अ. शेअररुपानें चरित्रास मदत करणारांचीं नांवें. | |
| ,, ब. देणगी ,, ,, ,, ,, ,, | |
| नामदेव—महाराजांचा फोटो. | |
| फोटोस अनुलक्षून पद. | |
| प्रकाशकाचें दोन शब्द. | |
| श्रीसंतनामदेव चरित्र पूर्व खंड. | १–२० |
| मध्यम. ,, | २१–३६ |
| उत्तर. ,, | ३७–९६ |

# अर्पणपत्रिका.

## श्रीसंत कवि दासगणूमहाराज

ह्यांच्या चरणीं सप्रेम समर्पण.

पृथ्वी.

वघूनि बहु ज्याचिया नव रसाळ काव्याप्रती ॥
महिपतिच जन्मला फिरुनिया गमे संप्रती ॥
न अन्य, हरिकीर्तनीं करित काव्य–संतर्पण ॥
अशा न पुरुषां करूं तरि कुणा करूं अर्पण ॥ १ ॥

जसा उदयभानु तो बसुनि पार्श्वभागीं रथीं ॥
पुढें करुनि दावितों अरुण पांगळा सारथी ॥
करी रसिकपात्र जो मज अजाण पोरासही ॥
मदल्प कृति अर्पितों म्हणुनि मी मुदें त्यास ही ॥ २ ॥

दासानुदास,

देवीदास लक्ष्मण महाजन.

# परिशिष्ट अ.

प्रस्तुत चरित्रास शेअर घेऊन मदत करणारांचीं नांवें:—

| | रुपये |
|---|---|
| श्रीयुत गंगाधरपंत रखमाजीशेट सुबंध | ५० |
| ” रंगनाथपंत हरि भाळुंकर B. A. LL. B. | २५ |
| ” विठ्ठलशेट अण्णा पतंगे | १५ |
| ” नामदेवशेट चिमणाजी पतंगे | १५ |
| ” बळवंतराव बाबाजीशेट निर्गुडे | ५ |
| ” बाबुराव आत्मारामशेट बाचल | १० |
| ” उद्धवराव मुरलीधरशेट हिरवे | १५ |
| ” बाबुराव बाबाजी पोटे | १० |
| ” सदाशिवराव गणपत काळे | १५ |
| ” राघोबाशेट केशव भावकर | ५ |
| ” विश्वनाथशेट गणपत भावकर | १० |
| ” पंढरीनाथ नारायणशेट पाटसकर | १० |
| ” दामोदर बळवंतशेट खुर्द | ५ |
| ” पांडुरंगशेट ग्यानोबा शेंडगे | ५ |
| ” अनंतराव गणेश मांढरे | ५ |
| ” भाऊसाहेब अण्णा पतंगे | ५ |
| ” भिकन उद्धवशेट काळे | ५ |
| ” ज्ञानेश्वर उद्धव मांढरे | ५ |
| ” विनायकराव दामोदर निखळ | ५ |
| ” जनार्दन नीळकंठ झणकर | १० |
| ” म. मा. फटाले ५ श्रीयुत द. रा. काळे | ५ |
| ” द. ग्या. भुतकर ५ श्रीयुत ग. वि. माळवदकर | ५ |
| ” वि. ह. ढवळे ५ श्रीयुत बा. मा. बाचल L.C.E. | ५ |

# परिशिष्ट ब.

प्रस्तुत चरित्रास देणगीरूपानें मदत करणारांचीं नांवें:—

| | |
|---|---|
| श्रीयुत शंकरराव मुकुंदशेट खांडके, मुंबई | ५ |
| श्रीशनैश्वर ( मुंबई नं. २ ) C/o न. पां. नवरे नं. ७ झावबाचीवाडी | १८१ |
| श्रीयुत बळवंतराव बाबाजीशेट निर्गुडे | ५ |
| ” गोविंदशेट अण्णा. पतंगे | १० |
| ” बाजीराव नारायणशेट पोरे | ५ |
| ” ज. पु. बंगाळे २ श्रीयुत ब. आ. हिरवे | २ |

३/०५
८२५

REFBK-0002838



श्री संतश्रेष्ठ नामदेव महाराज.

[ नामदेवसमाजांतील चित्रकारपटु कै. गणपतराव केदारी काकडे, ( व्हाइस प्रिन्सिपाल बॉंबे आर्टस् स्कूल ) ह्यांनीं श्रीनामदेव महाराजांची तजबीर प्रथमतः काढिली. तिला अनुलक्षून खालील कविता नामदेव मासिक वर्ष ३ अंक ४ मध्यें प्रसिद्ध झाली होती. ]

## पद.

[ चाल—भूपति खरें तें ]

[ श्रीनामदेव महाराजांची तसवीर पाहून ]

जडधी–मनुजातें स्वानुग्रहें कलिमाजीं ॥
भवसागर–तरणोपाय तया बुडती जी ॥
जो भक्तश्रेष्ठ अवतरला धरणीवरती ॥
शम-आदि गुणान्वित तत्पदिं ही मम प्रणति ॥
यत्कालपनीक प्रतिकृति केदारी-तनयें ॥
काढिली काकडे वंशोद्भव गणपतिनें ॥
  जो चित्रकारपटु होई, वाचक ॥
  तैं चित्र काढिलें हें, सुखदायक ॥
  श्रीनामदेवप्रभु भक्त–नायक ॥
यत्प्रातिकृति बघुनी मना मोद बहु होतो ॥
उदरीं न मावतो परि बाहेरीं येतो ॥ १ ॥

श्रीविठ्ठलमय होऊन नाचती प्रेमें ॥
विसरून आपुलीं आणि जगाचीं कामें ॥
चिपळ्या वाजविती धरुनि वाम-हस्तांत ॥
कीं गुंते दक्षिणहस्त वीणानादांत ॥
तत्पादनुपुरख मंजुळ अतिशय होतो ॥
मंडपोदरीं जो दुमदुमुनीयां जातो ॥
  हें भजन चाललें ऐसें, प्रीतिचें ॥
  उरलें न नांव भवसागर-भितीचें ।
  यत्सत्वें सोनें होई, मातिचें ।
ही मूर्ति पाहतां मनांत संशय येतो ॥
" श्रीनामदेवकालीन जनामाधिं फिरतो " ॥ २ ॥

( कविः—रंगनाथ. )

# प्रकाशकाचे दोन शब्द.

कासया बहुवसी घालसी मन ॥ तुजविण मना काय काय काय ॥ १ ॥
एकपणीं एक एकपणीं एक ॥ एकचि अनेक विस्तरलें ॥ २ ॥
अनेक तत्वांतें झणी देसी थारा ॥ न चुकती येरझारा संसारीच्या ॥ ३ ॥
म्हणे **गोराकुंभार** कोणा नाहीं दुजे ॥ **विश्वरूप तुझें नामदेवा** ॥ ४ ॥

ता. २२।७।२२ रोजीं **श्रीसंत दासगणू महाराज** ह्यांचें पुणें–लष्करांत श्रीनामदेव पुण्यतिथीनिमित्त कीर्तन झालें. त्यावेळीं नामदेव–चरित्राविषयीं चर्चा निघाली असतां रा. रा. **देवीदास लक्ष्मण महाजन** नांदेड, ह्यांनीं नामदेव-महाराजांचें काव्यमय चरित्र लिहिलें आहे, असें श्रीसंत दासगणूमहाराजांकडून कळालें. त्यांच्या विचारानें रा. महाजन ह्यांना विनंति केल्यावरून त्यांनीं तें प्रसिद्ध करण्याची मोठ्या आनंदानें परवानगी दिली. त्याबद्दल नामदेव–समाज उभयतांचाही अत्यंत ऋणी आहे.

दरम्यान प्रकाशकाला अनेक अडचणीमुळें प्रस्तुत चरित्र यापूर्वींच प्रसिद्ध करतां येणें शक्य झालें नाहीं व या वर्षींही तें प्रसिद्ध करण्यासारखी परिस्थिति नव्हती. वरील अडचण येथील समाजबंधूपुढें मांडतांक्षणींच त्यांनीं तत्काल, उदार व दिलदार अंतःकरणानें शेअर घेऊन व देणगी देऊन प्रस्तुत चरित्र प्रसिद्ध करण्यास जें साहाय्य दिलें, त्याबद्दल प्रकाशक त्यांचा अत्यंत आभारी आहे. मदत करणारांचीं नांवें पुस्तकांत दुसरीकडे दिलीं आहेत. त्यांच्या साहाय्याशिवाय प्रस्तुत चरित्र प्रसिद्ध करणें मुळींच शक्य झालें नसतें. ह्यामुळें चरित्र प्रसिद्ध करण्याचें सर्व श्रेय खरोखर त्यांच्याकडेच आहे. प्रकाशक केवळ निमित्तमात्र कारण आहे.

वरील चरित्र फक्त १५।२० दिवसांच्या पूर्वींच छापण्याचें ठरलें, व अशा निकडीच्या वेळीं जगद्धितेच्छु छापखान्याचे कर्तव्यदक्ष व दिलदार चालक श्री. नानासाहेब गोंधळेकर ह्यांनीं ‘ संतसेवा ’ समजून प्रस्तुत चरित्र सवलतीच्या दरानें, त्वरेनें व सुबकरीतीनें छापून दिलें, त्याबद्दल त्यांचे आम्ही अत्यंत आभारी आहोंत. त्यांच्या कारखान्यांतील रा. गोखले वगैरे मंडळींनींहि बरेंच साहाय्य केलें आहे, त्याबद्दल आम्हीं त्यांचे सप्रेम आभार मानितों.

याशिवाय लक्ष्मीवैभव-प्रेसचे मालक ह्यांनीं चरित्रांतील फोटो सुबक छापून त्वरित पाठविल्याबद्दल, रा. रा. रं. ह. भाळुंकर बी.ए., एल्.एल्. बी.

ह्यांनीं ' नामदेव महाराजांची तसवीर पाहून केलेलें ' पद छापण्यास परवानगी दिल्याबद्दल व ' संत--नामदेवाचे ' संपादक रा. रा. शां. ह. भिरजकर ह्यांनीं चरित्र–प्रसारासाठीं जें सर्वतोपरि साहाय्य केलें, त्याबद्दल प्रकाशक सर्वांचा अत्यंत ऋणी आहे.

प्रस्तुत चरित्रकार रा. दे. ल. महाजन ह्यांची ओळख ' कवि ' या दृष्टीनें महाराष्ट्रास यापूर्वींच झालेली आहे. कारण त्यांनीं आपलें कांहीं काव्य यापूर्वींच प्रसिद्ध केलेलें आहे. ते उत्तम कीर्तनकारही आहेत. नांदेड येथील ' कीर्तन-संस्थेंत ' त्यांचें विशेष अंग असून ' आख्यान-रत्न-माला ' ही त्यांच्या साहाय्यानें निघत असते.

प्रस्तुत चरित्र अत्यंत रसाळ, प्रासादिक, साधें व हृदयस्पर्शी आहे. कवि रघुनाथपंडितांचें जसें ' नल–दमयंती आख्यान ' तसेंच रा. महाजन ह्यांचें हें ' नामदेव--चरित्र ' पुढें सर्वतोमुखीं होण्याचा संभव आहे. भाविक अंतःकरणाचा ओलावा त्यांत जागोजागीं दिसून येतो. शिवाय नामदेव–कालीन परिस्थितीचेंही शब्दचित्र कवीनें बऱ्याच चांगल्यातऱ्हेनें रेखाटलें आहे. तें शब्दचित्र रेखाटतांना प्रस्तुत धार्मिक, सामाजिक व राजकीय परिस्थितीची थोडीशी छाया त्यांत पडणें हेंही अगदीं साहाजिक आहे.

सर्व भक्तांत नामदेवासारखा लडिवाळ, प्रेमळ व भाविक भक्त दुसरा नाहीं अशी श्रीविठ्ठलाचीच वाणी आहे. पुष्कळ संतांची व कवींचीही नामदेव महाराजांसंबंधीं तशींच वर्णनें आहेत. तेव्हां रसिक वाचकांच्या हातीं प्रस्तुत ' कविचरित्र ' देतांना कविवर्य मोरोपंतांनीं ' नामदेव–महाराजांचें छोटेंसें काव्य-चरित्र ' केलें आहे तेंच देऊन आतां वाचकांची सप्रेम रजा घेण्यापूर्वीं प्रस्तुत चरित्र–सेवा सर्व गोड करून घेत अशी इच्छा प्रदर्शित करून ही सेवा ' विठ्ठल-अर्पण ' करितो !—

## मोरोपंतकृत आर्या.

श्रीनारदमुनिचें जें सुमहद्व्रत तेंचि नामदेवाचें ॥
याणें प्रसिद्ध केलें विठ्ठल हें भव्य नाम देवाचें ॥ १ ॥

शतकोटी अभंग मुखें कवि सत्तम हा सुखें वदे वा हे ॥
पूजा न आठवूं दे लक्ष्मीचीही सुखें व देवा हे ॥ २ ॥

भक्ति प्रताप लोकीं अत्यद्भुत याचि नामदेवाचा ॥
परमप्रिय भक्तसखा कीं आम्हां आप्त कामदेवाचा ॥ ३ ॥

बाळपणींच म्हणे हा नामा श्रीविठ्ठलास जेव कसा ॥
देव कसा उतरे जो त्याचा होतो स्वयेंचि सेवकसा ॥ ४ ॥

तो शुद्ध **नामयाच्या** जो गातो आदरें अभंगातें ॥
जें पातक जड इतरां श्रीगंगेच्या तसें न भंगातें ॥ ५ ॥

परमेश्वरप्रसादें भक्तीं अत्यद्भुता वसे शुचिता ॥
रुचिताप हरी तीनही न तदुक्ति ब्राह्मणासि कां उचिता ॥ ६ ॥

किंबहुना **नाम्याची** भक्ता दासी जनी तिची वाणी ॥
खाणी पातक आणी तरिच खळाच्याहि लोचनीं पाणी ॥ ७ ॥

ज्ञानेश्वर ने तीर्थां विरहें चिंता अनामया लागे ॥
प्रभु साश्रु श्रीस म्हणे मम मन विसरे न **नामयाला** गे ॥ ८ ॥

उद्धव अक्रूर प्रिय भक्त श्रुत देव बहु असे कोटि ॥
परि **याचि नामदेवीं** प्रीतिच रम बालकीं तसी मोठी ॥ ९ ॥

निर्जळ देशीं भरला अड घेतां स्मरुनि आळ या तृषितें ॥
प्रभुनें तेंवीं जपावें भक्तास जसें कृषिवळें कृषितें ॥ १० ॥

उठवी यवन प्रतिहता धेनु **श्रीनामदेव** मग तो बा ॥
निजकर्ण पिळूनि म्हणे अति पश्चात्ताप पापनग तोबा ॥ ११ ॥

झाला हा गुप्त महाद्वारीं जी प्रथम पायरी तींत ॥
घालिति जडाहि याचे आपुलिया सदय पाय रीतींत ॥ १२ ॥

न करी जपोनि आंगें वळकट घालूनी काय कच्छ पर ॥
त्या **नामदेवजीचें** श्रीविठ्ठल विश्वनायक छपर ॥ १३ ॥

एक जनी हरिभक्ता सिंप्याची हरि हरी म्हणे वाटिक ॥
तीस दळाया लागे भगवान् वदतील साधु कां लटिक ॥ १४ ॥

प्रभुतें तसेंचि संत स्तविती सप्रेम **नामदेवास** ॥
त्यासि मयुर म्हणे वा स्वप्रेमाचाचि लेश देवास ॥ १५ ॥

पुणें, जुलै १९२३.
( आषाढ—१८४६. )

आपला नम्र सेवक,
**विठ्ठल लक्ष्मण सुबंध.**

काव्य ५२७

# श्री संत नामदेव.

## ( पूर्व खंड. )

१ श्लोक [ भु. प्र. ]

कलौ नामसंकीर्तनीं देव पावे ॥ म्हणूनी सदा अंतरीं तें जपावें ॥
जनीं तत्वबोधार्थ ये जो स्वभावें ॥ नमस्कार त्या नामदेवास भावें ॥१॥

२ आर्या [ गीति ]

मौक्तिकमाणि सागरिं निज संरक्षण जेवि पावतो शिंपीं ॥
शिंपी नामामृत, मृत अमर करी नामदेव तो शिंपी ॥ १ ॥

३ पद [ चाल—प्रतिकूल होइल. ]

देव पंढरीचा तैसा भक्त पंढरीचा ॥
किती वर्णूं महिमा आतां क्षेत्र पंढरीचा ॥ देव० ॥ ध्रु० ॥
' देव, भक्त, नाम, कथेचा त्रिवेणीसंगम ' ॥
स्नान करी नेमें तेथें जीव पंढरीचा ॥ देव० ॥ १ ॥
' मुखीं नाम मोक्षचि हातीं साक्ष बहुतांसी ' ॥
देववृंद वांच्छी चित्तीं वास पंढरीचा ॥ देव० ॥ २ ॥
' पुंडलिकासाठीं उभा युगें अठ्ठावीस ' ॥
देवीदास म्हणे विठू, नाथ पंढरीचा ॥ देव० ॥ ३ ॥

४ ओंवी

मातेचें नांव गोणाबाई ॥ कांताऽभिधान राजाई ॥
परि श्रीविठ्ठलाच्या पायीं ॥ चित्त नाहीं तयांचें ॥ १ ॥

---

१ कलियुगांत. २ घोकावें, जपून ठेवावें. ३ या तत्त्वाचा बोध करण्याकरितां. ४ मोत्यें. ५ शिंपल्यांत. ६ प्रोक्षण करी. ७ जातिविशेष. ८ कथा त्रिवेणी संगम । देव भक्त आणि नाम ॥—तुकाराम. ९ मुखीं नाम हातीं मोक्ष । ऐसी साक्ष बहुतांसी—तु०. १० युगें अठ्ठावीस विटे०—नामदेव. ११ स्त्रीचें नांव.

## ५ ओंवी

दामा शेटी नामें जनक ॥ तो मात्र होता भाविक ॥
प्रतिदिनीं पूजी वैकुंठनायक ॥ नैवेद्य दुधाचा दाखवुनी ॥ १ ॥

## ६ आर्या [ गीति ]

अन्य ग्रामीं जातां सांगे, तो जनक नामदेवास ' ॥
' देवास दूध देईं; जो पदिं, घेतां स्वनाम, दे वास ' ॥ १ ॥

## ७ श्लोक [ शा० वि० ]

चित्तीं होउनियां अनन्यगति तें तो देव-पूजा करी ॥
बोले झांकुनि नेत्र, ' हे प्रभुवरा ! नैवेद्य हा स्वीकरीं ' ॥
प्राशी दुग्ध विठू करीं धरुनियां, कीं तें तसें राहिलें ॥
हें त्यानें उघडून नेत्र सहजीं मध्यंतरीं पाहिलें ॥ १ ॥

## ८ ओंवी

दुग्ध न प्राशी पांडुरंग ॥ ऐसा पाहून प्रसंग ॥
नामदेवाचें अंतरंग ॥ उद्विग्न झालें तेधवां ॥ १ ॥

नामदेव ( देवास ):—

## ९ श्लोक [ पृथ्वी ]

प्रभो ! प्रतिदिनीं पदा पुजुनि दुग्ध पाजी पिता ॥
मनीं न धरिली अढी, कधिंहि अल्पशंका पितां ॥
असें असुनियां विठो ! वद मदंत कां पाहसी ? ॥
अजाण तव पोर हा, छल तरी कसा साहसी ? ॥ १ ॥

नामदेव ( देवास ):—

## १० पद [ चाल—ये धांवत कृष्णाबाई० ]

कां गोरस हा गोपाला ! निजवदनाला नच लाविसि या समयाला ॥ध्रु०॥
मज पाहुं नको मतिमंदा श्रीगोविंदा ! सांभाळ आपल्या ब्रीदा ॥

---

१ बाप. २ दररोज. ३ विश्रांति. ४ एकनिष्ठ. ५ पितांना. ६ मूढाला.

'गोपाल' तुझें अभिधान ॥
गो तुला जीव कीं प्राण ॥
तुजवांचुनि जी निस्त्राण ॥
चोरितां तिच्याच रसाला अनय न झाला त्या प्रेमाला ॥
नेलेंस कसें विलयाला ? ॥ १ ॥
गोकुलीं करवुनी स्वजनां या रसपाना केलेंस तुष्ट गोपांना ॥
गो-वत्स होउनी तृप्त ॥
उर्वरीत दुग्ध न गुप्त ॥
ज्या भू-मातेला प्राप्त ॥
तिजवरती गो-रक्ताला पूराचि आला म्हणुनी झाला ॥
का खेद सदय हृदयाला ? ॥ २ ॥
बालकें तीन वर्षांचीं मृत्युमुखाचीं जाहलीं भक्ष्य नित्याचीं ॥
जीवनाहि पुरतें त्यांना ॥
गायींचें दूध मिळेना ॥
त्या योगें त्यजिती प्राणां ॥
पाहुनि मरणोन्मुख बालां सुख व्हायाला कथिसी मजला ॥
कीं पाजिव याच पयाला ॥ ३ ॥
तुज अल्प अर्पितां देवा ! करुनी सेवा मग मिळेल अगणित मेवा ॥
तव कृपाकटाक्षें आम्हां ॥
सुख संतत मेघश्यामा ! ॥
म्हणुनी करि पूरित कामा ॥
जरि वंचिसि दीनदयाला ! समज मनाला अर्पण झाला ॥
हा देह तुझ्या पायाला ॥ ४ ॥

११ श्लोक [ व. ति. ]

निर्धार पूर्ण वरिला जंव नामदेवें ॥
'श्रीभक्तवत्सल' असें निजनाम देवें- ॥
रक्षावया मधुर गोरस-पान केलें ॥
याचित्त शुद्ध भजनास सदा भुकेलें ॥ १ ॥

---

१ निराधार. २ अन्याय. ३ उरलेलें. ४ जिवंत राहण्यापुरतें. ५ दुधाला. ६ नेहमीं. ७ पूर्ण ८ इच्छेला. ९ उपेक्षिसी.

दामाशेटी ( नामदेवास ):—

१२ श्लोक [ व. ति. ]

केलेंस धन्य मजला आजि नामदेवा ॥
गोदुग्ध पाजवुनि पूर्णकाम[1] देवा ॥
जो पूजितां विफल[2] जन्म मदीय गेला ॥
तो तूं क्षणांत वश विठ्ठल आज केला ॥ १ ॥

१३ ओंवी.

नामदेवास म्हणती ज्ञानेश्वर ॥ चला तीर्थयात्रा करूं भूवर ॥
देवता--स्थानें थोर थोर ॥ पाहूं भेटती संत जे ' ॥ १ ॥

नामदेव ( ज्ञानेश्वरास ):—

१४ श्लोक [ स्रग्धरा. ]

तीर्थें कोट्यानुकोटी प्रभु--पदिं असतां तीर्थयात्रा कशाला ? ॥
देवांचा देव माझा कमलमुख विठू, देवता त्या कशाला ? ॥
भेटावें एकमेकां म्हणुनि वसविली पंढरी पांडुरंगें ॥
त्यावें येथूनि जाया मजसि वद कसें या मदीयांतरंगें[3] ? ॥ १ ॥

१५ ओंवी.

नामदेव म्हणे देवाप्रत ॥ ' श्री ज्ञानेश्वरादिकांसहित ॥
पहावया दैवतें, संत ॥ तीर्थाटनास जाऊं का ? ' ॥ १ ॥

देव ( नामदेवास ):—

१६ पद. [ चाल—भूपती खरें तें० ]

पर्वणी लाधली[4] अमोल नरदेहाची ॥
तरि सोड मुमुक्षो ! आस[5] सर्व गेहाची[6] ॥ १ ॥
अज्ञांत[7] असे ती घटका देहांताची[8] ॥
निजकल्याणास्तव धरि संगति संतांची ॥ २ ॥

---

१ पूर्णकाम. २ व्यर्थ. ३ माझ्या मनानें. ४ मिळाली. ५ आशा. ६ घर. दाराची. ७ माहीत नसलेली. ८ मरणाची.

करि तदर्थ यात्रा भूवरिच्या तीर्थांची ॥
जी ' समर्थ ' करित्ये आश्रित असमर्थांची ॥ ३ ॥
अर्वलोकीं स्थानें भिन्न भिन्न देवांचीं ॥
करितील उभा इतिहास गुप्त तो वाची ॥ ४ ॥
अति बद्ध, मुमुक्षुजनांसी भेटुनी ॥
साधकां, सिद्ध पुरुषांसी भेटुनी ॥
सहवास करवा त्यांशीं भेटुनी ॥
सर्वत्र वाढवी महती सन्नामाची ॥
मग तीच पर्वणी होईल तरि कामाची ॥ ५ ॥

## १७ श्लोक [ शा. वि. ]

ज्ञानेशासह नामदेव करितो सर्वत्र तीर्थाटनें ॥
प्रेमें बोधुनि भाविकांस, खल जे त्यांचीं मतोत्पाटनें ॥
केला दक्षिण–भाग पावन यदा सन्नीतिच्या वर्तनें ॥
गेला प्रेषितँ हस्तिनापुरिं तदा तो नामसंकीर्तनें ॥ १ ॥

## १८ कटाव.

पूर्व प्रथितां हस्तिनापुरी, ' धर्मक्षेत्रा 'भिधान जिचें, सार्वभौम सिंहासनमांडित, भूमिभाग तो नृपतिपदांकित; निजशस्त्रांचा करुनी मांडव, जिथें झुंजले कौरव, पांडव, खलजनिं केला अकांडतांडव[11], दिलें आग्नीला ज्यानें खांडव[12], विजयी झाला अर्जुन जेथें, संतमंडळी आली तेथें, नामदेव तो उद्धव भूवर, निवृत्ति सद्गुरु जो प्रति शंकर, महाविष्णु तो श्रीज्ञानेश्वर, ब्रम्हदेव सोपान जन्मला, मुक्ताबाई पूर्ण चित्कला, समागमें घेऊन चालिला; चतुर्विधा किंवा या मुक्ति, मूर्तिमंत तो नामा भक्ति, भरली ज्याच्या मनीं विरक्ति, सोडुनियां संसारासक्ति, भक्तीतचि ज्याची अनुरक्ति: पंचायतनें प्रवेश केला, नगरामाजी उतरायाला, द्वापारयुगिंचें पुराण पत्तन. ' धर्म ' नृपाचें

---

१ कल्याणाकरितां. २ पहा. ३ देवतांचीं. ४ चोंहींकडे. ५ मतांचें खंडन. ६ प्रांत. ७ धर्मसंस्थापनार्थ अवतारी पुरुष. ८ दिल्लीत. ९ प्रसिद्ध. १० ' धर्मक्षेत्र ' हें नांव. ११ गजबजून सोडणारें कार्य. १२ वनविशेष. १३ सलोकता, समीपता, सरूपता, सायुज्यता.

तें सिंहासन, कलींत झालें पूर्ण विडंबन, काय करूं मी त्याचें वर्णन; यवन-भूप तो जलाल-उ-दिन, पुतण्या त्याचा अल्ला-उ-दीन, सुभेदार तो त्या नगरीचा, प्रसर यावनी साम्राज्याचा, आर्यावर्तीं करावयाचा, निश्चय त्याचा; ऐशा समयीं महाराष्ट्रदेशीय मंडळी, तेथें जमली, धर्मबंधु भागिनींची पाहिली, निराश वृत्ति जी झालेली, प्रभुरायाच्या सगुण कीर्तनीं, ध्याया आकर्पून तत्क्षणीं, मंदिर वघती प्रस्थानाला, विषाद तेव्हां गमे मनाला; देव-मंदिरें स्मशान झालीं, स्मशान-भूमी मंदिर बनली; जिकडे तिकडे शुभ्र मशीदी, गल्लोगल्लीं वहुत समाधी, कसाइखानें, तशीं दुकानें, चर्मरहित तीं मांसमयी पक्षांचीं प्रेतें, वघतां ज्यातें चिळस मनातें, परि यवनातें तीं पक्वान्नें; अस्थींचा तो ढीगचि झाला, पुढें चालतां दृष्टिस पडला, शुद्ध मार्ग नच चालायाला, हिंदु जनांची पूज्य देवता, जी गोमाता, चरचर चरचर कंठ कापितां, हंवरडा ती फोडूं लागतां, चर्र म्हणुनि करि तेव्हां चित्ता; त्यांत आमचे संत कोवळे, भूतदयेचे केवळ पुतळे, पाहुनि सर्व अधार्मिक चाळे, निजधर्माचे लोक बावळे, भोळेभाळे, प्रेतापरि ते झाले सगळे, त्यावरि टोंचिति दुष्ट कावळे, शब्द मुखांतुनि एक निघेना, सर्वस्वाची झाली दैना, सुखशांतीला ठाव मिळेना, उद्धाराचें तत्व कळेना, कळे परी तें चित्त वळेना, अभिमानाचा पीळ जळेना, समाजांतलें पाप पळेना, लेशमात्रही दुःख टळेना; वघुनि अवस्था यापरि त्यांची, द्रवली वृत्ति तया संतांची, परम ' भागवत-धर्म ' जनांप्रत, वोधायांतें तत्पर निश्चित होउनि वदली ज्ञानेशाची शुद्ध वैखरी, " देवद्वारीं उभा क्षणाभरीं, तेणें चारी मुक्ति साधिल्या; " नामा ऐसें वचन ऐकुनी, देवद्वारीं उभा राहुनी, ' विठ्ठल ' ' विठ्ठल ' म्हणे गर्जुनी, टाळांचा तो खणखणला ध्वनि, कर्णीं पडतां धांउनि आले, यवन तेथले गोळा झाले, कर्कश शब्दें म्हणूं लागले, ' क्यौं वे काफिर ! धूम मचाई, कंबख्ती क्या तुझको आई, मस्जिद तेरे खडी सॉमने, आंख खोलकर देख दिवाने; " या परि कटुवच यवन बोलले,

---

१ शके १२१४।१५ पांगारकृत ज्ञानेश्वरचरित्र पृ. १०८. २ मुक्काम करावयास ३ कातडीं सोलून टांगून ठेवलेलीं. ४ हाडांचा. ५ आमचे पूर्वज असे होते, आमचा धर्म सनातन आहे, असा नुसता अभिमान. ६ देवाचिये द्वारीं उभा क्षणभरीं । तेणें मुक्ति चारी, साधियेल्या—ज्ञानेश्वर. ७ हिंदू—मूर्तिपूजक. ८ मशीद ९ समोर.

नामयास तें ऐकुं न आलें, कीर्तनरंगीं चित्त रंगलें, देहभान त्या किमपिहि नुरलें, ऐसें पाहुनि यवन निघाले, झणीं सुभेदारास भेटले, वृत्त तयांनीं त्यातें कथिलें, " दक्कनसे कुइ काफिर आया, मसजिदका भी ख्याल नहि किया, मंदिरमें सब धूम मचाया, गुन्हेगार[1] है खुदावंतका, " सुभेदार तें ऐकुनि चिडला, तत्क्षणिं त्यानें हुकूम सोडिला, " गुन्हेगार जो होंगे काफिर, शहर[2]-बदर तुम करो उन्होंको; आगे चलकर[3] कोई हिंदू, ढोल वजाकर वाज[4] पढेंगे, गुन्हेगार समझे जायेंगे सजा[5] हुजुरसे वो पायेंगे, " डांगोरा हा ग्रामीं पिटिला, यवनांना आनंद जाहला, हिंदूंचा तो मार्ग खुंटला, प्रसंग दुर्धर कसा लोटला !

त्या समयाला प्रतिबंध कीर्तना झाला ! ॥

## १९ ओंवी.

हिंदू धार्मिक नागरीकांनीं ॥ विचार केला निजमनीं ॥
कीं सर्वांनीं मिळूनी ॥ करुणा नृपाची भाकावी ॥ १ ॥

## २० पद [ चाल—भूपती खरें. ]

निघतांच नृपाची करुणा भाकायाला ॥
दुर्दैव आडवें आलें त्या समयाला ! ॥ १ ॥
बांधून उपरणें कपाळपट्टी कानीं ॥
घातलें अंथरूण तेव्हां कित्येकांनीं ॥ २ ॥
जाहला कुणांला अतिसाराचा रोग ॥
पोटशूळ कोणां, अर्धशिशीचा भोग ॥ ३ ॥
कुणिं दिला भागवत—सप्ताहाला थारा ॥
कुणिं केला गांवांतून हलुंच पोबारा ॥ ४ ॥
' धाडून कुणा एका द्या ' कुणि म्हणे ॥
' भूपास पत्रें लिहुनी द्या ' कुणि म्हणे ॥
' तुम्ही नाद सोडुनी हा द्या ' कुणि म्हणे ॥
ना मार्ग एक लागला लोक--गंगेला ॥
किति वाट पाहुनी भास्कर अस्ता गेला ॥ ५ ॥

---

१ अपराधी. २ हद्दपार. ३ यापुढें. ४ भजन, कीर्तन. ५ शिक्षा ६ व्यथा. ७ अर्ज.

## २१ श्लोक [ व. ति. ]

केला विचार मग भाविक धार्मिकांनीं ॥
घालूं स्वयें नृपतिच्या ' इतिवृत्त[1] ' कानीं ॥
येईल अल्पहि तयास दया जनाची ॥
आज्ञा करिल नगरांतचि कीर्तनाची ॥ १ ॥

## २२ पद [ गजल. ]

गुजारिश[2] आज करते है, हुजुरपुरनुरके खिदमतमें[3] ॥
रियाया[4] सब ये तेरी है, शहानशाह[5] तूं हमारा है ॥ ध्रु० ॥
खुदावंदके रियासतको[6], मुबारकबाद[7] देते है ॥
खुषीसे सर[8] झुकाना ये हमेषा फर्ज[9] हमारा है ॥ १ ॥
अगर हिंदू, मुसलमां, [10]हो, हर एक जिसने किया पैदा[11] ॥
तुम्हारा जो ' खुदाताला, ' ' हरी ' वोही हमारा है ॥ २ ॥
खुदातालासे मिलनेके, हुये दोनो खुले[12] रास्ते ॥
तुम्हे ' मजहब[13] ' तुम्हारा है, ' धरम ' हमको हमारा है ॥ ३ ॥
हुयी जो हुकुमसे बंदिष[14], हमारे वाज करनेमें ॥
निकाली जाय, मारूंजा, हुजुर ! इतना हमारा है ॥ ४ ॥

## २३ श्लोक [ शा. वि. ]

ऐसी जी करुणा तदा बुधजनीं नम्रस्वरें भाकिली ॥
आश्चर्यें यवनाधिपें नृपवरें[15] सांद्यंत[16] ती ऐकिली ॥
घेतां शोध कळे, तया न कळतां फर्मान[17] हें सोडिलें ॥
दोघांचेंहि[18] कृतैक्य[19] बंधु-तनयें[20] वाटे वृथा मोडिलें ॥ १ ॥

## २४ श्लोक [ पृथ्वी. ]

विचार करुनी जरा, नृपति तो वदे तेधवां ॥
" कथा मजसि, काय तें स्वमनिं इच्छितां येधवां ॥

---

१ हें वर्तमान. २ प्रार्थना. ३ सेवेंत. ४ प्रजा. ५ सार्वभौम. ६ राज्यास ७ धन्यवाद. ८ शिर. ९ कर्तव्य. १० हिंदु असो, मुसलमान असो ! ११ निर्माण १२ मोकळे–स्वतंत्र. १३ धर्म. १४ प्रतिबंध. १५ जलालुद्दिनानें. १६ संपूर्ण. १७ हुकूम. १८ हिंदु मु० चें १९ केलेला समेट. २० पुतण्यानें–अल्लाउद्दिनानें.

प्रजाजन तुम्ही रहा ! मिळुनि भिनधर्मी तरी ॥
अभीष्ट मम चिंतुनी सतत आपुल्या अंतरीं " ॥ १ ॥

२५ आर्या [ गीती. ]

करुनि कृपा हे भूपा ! बापा ! तूं अभय वचन दे वाचे ॥
कीं ' नगरांतचि व्हावें, कीर्तन त्या संत नामदेवाचें ' ॥ १ ॥

२६ दिंडी.

मुखें आज्ञा नृप करी कीर्तनाची ॥
सुखी झाली तैं वृत्ति सज्जनांची ॥
देत आले त्या ' धन्यवाद ' सारे ॥
' विजय झाला ' मानिं म्हणाति, ' हा कसा रे ! ' ॥ १ ॥

२७ आर्या [ गीति. ]

भरती आली त्यांना, भ्यालेले भ्याड जे भरंवशाचे ॥
' शाबास ' कुणी म्हणती, ' आतां भय कीर्तनाप्रति कशाचें ? ॥ १ ॥

२८ पद. [ चाल—लावणी. ]

निःशंकपणानें तदा हस्तिनापुरीं ॥
कीर्तनें नामदेवाचीं, चाललीं चव्हाट्यावरी ॥ ध्रु० ॥
त्रयवर्णी द्विज, शूद्रातिशूद्र नर जरी ॥
सर्वांस लाभ लाभावा, सारखा सर्वतोपरी— ॥ १ ॥
म्हणुनियां मोकळ्या पटांगणाभीतरीं ॥
बसविलीं सर्व नर, नारी, त्युजुनियां भेद अंतरीं ॥ २ ॥
प्रथमतां कुणी येइना कीर्तनाप्रति ॥
तव ' भवति नें भवति ' जनाची, चालली परस्पर अति ॥ ३ ॥
कुणी म्हणे, ' घडीभर चला जाउं कीर्तना ॥
करमणूक होईल थोडी, त्या योगानें तरि मना ' ॥ ४ ॥
कुणि म्हणे, ' कशाचें कीर्तन घेउन तरी ॥
बसलांत खुळ्यापरि आतां, उद्योग शिराच्या वरी ' ॥ ५ ॥

---

१ निरनिराळ्या धर्मांचे. २ कल्याण. ३ ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य. ४ कीर्तनास जावें किंवा नाहीं, या संबधीं विचार.

ऐकून तयाचे बोल कुणी बोलती, ॥
‘ हें[1] सर्वहि पोटासाठीं, सोंगातें संपादिती ’ ॥ १९ ॥
येउनी एक पुसतसे तया भाविका, ॥
“ आम्हांस सांग रे ! वेड्या ! अधिकार असे त्यास का ? ॥२०॥
श्री नारदमुनिच्या गादीचीं यापरी ॥
तो शूद्र असुनि जातीचा, मग विटंबना कां करी ? ॥ २१ ॥
हे असो भजावा कुणिहि सखा श्रीहरी ॥
प्रतिबंध तयाला नाहीं, मर्यादा राखुनि परि ॥ २२ ॥
श्रुति--शास्त्र--वचन ना कीर्तनांत निघतसे ॥
गीर्वाण[2] थोर वाणीचा, मुळिं गंध तयाला नसे ॥ २३ ॥
तो कवित्व करुनी म्हणे मुखानें स्वयें ॥
कविताहि पराची[3] त्याच्या, केव्हांहि मुखांतुनि न ये ॥ २४ ॥
आंधळे तयाला भक्त मानिती जरी ॥
देवास ‘ कृपण[4] ’ जो मानी, तो भक्त कशाचा तरी ॥ २५ ॥
लोकांत चालली निंदास्तुति यापरी ॥
कीर्तनास भाविक आले, पडतां न तयांच्या भरीं ॥ २६ ॥

## २९ दिंडी.

त्रिविध तापें जें तप्त मनीं झाले ॥
नामदेवाच्या कीर्तनास आले ॥
त्यांस बोधानें सुख प्राप्त व्हाया ॥
नामसंकीर्तन लागला कराया ॥ १ ॥

## ३० कटाव.

झाला तैं प्रारंभ कीर्तना, नामदेव तो करी नर्तना, भजन मार्गींच्या शुद्ध वर्तना, प्रपंचयोगें मुळीं आर्त[5] ना, अंतरिं ज्याच्या नसे स्वार्थ, परमार्थ साधुनी, श्रेष्ठ असा पुरुषार्थ मोक्ष तो प्राप्त व्हावया साधन कथितो; प्रभु-रायाचें; जगदीशाचें, अनंत कोटी ब्रम्हांडाच्या उत्पत्ति स्थितिलय--कर्त्याचें,

---

१ कीर्तनाचे वेळे रडे, पडे लोळे । प्रेमेंवीण गोळे दाटताती. २ संस्कृत. ३ दुसऱ्याची. ४ पतित पावन या पदांतः—घेसी तेव्हां देसी ऐसा अससी उदार। काय रोधूं देवा ! तुमचें कृपणाचें दार–नामदेव ५ पीडिलेला.

त्या श्रीहरिचें, नाम खरोखर, पावन सुखकर, उद्धरि सत्वर, पुंनीत करि नरनारि नीच तर, नामाची करि वर्णन महती, रोमांचाच्या उभ्या राहिल्या सर्वांगावरि समान पंक्ति; प्रेमें चढला रंग कीर्तना; 'विठ्ठल विठ्ठल' होत गर्जना, श्रोते प्रेमळ बसले श्रवणा, ज्ञानदेव, सोपान, निवृत्ति, वहिण धाकटी मुक्ताई ती, कीर्तनरंगीं प्रेमें डुलती; त्या रंगें श्रीरंग मोहिला; भक्तालागीं पहावयाला, आतुर होउनि धांवुनि आला, निजभक्ताची करीं धरुनियां ताल साथ तो करुं लागला; रंग असा हा लुटावयाला, दूर देशिंचा भक्तजनाचा संघ धांवला, मंगळवेढ्याहूनि पातला चोखामेळा; संत सांवता माळी आला; प्रेमा भारी गोरोबाला; रोहिदास त्या चांभाराला; पंढरिचा सोनार नरहरि, प्रपंचांतलीं कामें सारीं, दूर लगबगें तेव्हां सारी, सार न मानुनि निज संसारीं; यापरि दक्षिण ललामभूतां देवप्रिय त्या धार्मिकसंतां; श्रम न वाटले क्रमितां पंथा, उद्धरावया दीन अनाथा, ज्यांच्या मनिं धर्माची आस्था, साधन ज्यांची 'कीर्तनसंस्था' यापरि सारे संत सोयरे, दांभिकतेचें ज्यांस न वारें, हस्तिनापुरीं विठ्ठल गजरें, कीर्तनांत ते येउनि बसले; पंत 'बृहस्पति' वदले ज्याला, 'कीर्तनसुखार्थ जो अवतरला' अमृतराय कवि, भक्तकथेतें वर्णन करितां, मान्य करी ज्या 'कटाव' वृत्ता, मोहित होउनि मीं प्रेमानें, मंडित करुनी कविता त्यानें, वृत्त, वर्णिलें हें ओघानें; मान्य करावें वत्सलतेनें; असो तेधवां जयघोषानें कीर्तन चाले, प्रमुदित जन सर्वहि झाले ॥

निरूपण विषयः—

### ३१ आर्या [ गीति. ]

करिसी सुखार्थ तळमळ, तरि तूं जा एकवेळ पंढरिला ॥
स्नान करुनि भीमेचें, पुंडलिकासहित भेट त्या हरिला ॥ १ ॥

---

१ पावन. २ नामदेव कीर्तन करी ॥ पुढें काय नाचे पांडुरंग. ३ दूर करी. ४ दक्षिण प्रांतास भूषणभूत अशा. ५ नामसंकीर्तनाची अनादि परंपरा. ६ मयूरपंत. ७ आर्या कीर्तनसुखार्थ, झाला अवताराचि अमृतराय जीवाचाच—मोरोपंत. ८ आनंदित. ९ सुखालागीं करिसि तळमळ । तरि तूं पंढरीसी जाय एक वेळ ॥ मग तूं अवघाचि सुखरूप होसी । जन्मोजन्मींचें दुःख विसरसी ॥ चंद्रभागे करि इत्यादि- नामदेव.

पांडुरंगाच्या दर्शनाकरितां उत्तरेच्या लोकांनीं दक्षिणेंत यावें लागणार म्हणून श्रोतृवर्गांत नानाप्रकारच्या कल्पना चालूं लागल्या !

३२ ओंवी.

राजद्रोहाची चळवळ ॥ चालली कीर्तनरूपें केवळ ॥
म्हणून एक आर्यखळ ॥ जाऊन सांगे सुभेदारा ॥ १ ॥

अल्लाउद्दिनास हें वर्तमान समजतांच तो आपल्या चुलत्यास जाऊन म्हणतोः--

३३ श्लोक [ व. ति. ]

मोडूनि सौख्यद मदीय वृथा प्रतिज्ञा ॥
त्वां जी दिली सकल हिंदुजनांस आज्ञा ॥
जाती तिनें स्वजन सोडुनि राजनिष्ठा ॥
आतां नृपा ! नच उरेल तुझी प्रतिष्ठा ॥ १ ॥

३४ पद. [ चाल--जादुभरे तोरे० ]

ख्याल करो ! जरा सोचो मेहरवां ! ॥ ध्रु० ॥
दिया है आपने जो खास हुकूम हिंदूको ॥
नतीजा ये हुवा के कह न सके, मेरी जबां ज० ॥ १ ॥
हुवा है जुर्म यहां वाज के वहानेसे ॥
फरेबपाते है अपने लोग, हिंदु मुसलमां ज० ॥ २ ॥
तमाम हिंदु , " दक्कनको चलो " कहते है ॥
" अगरचे जाय जान गायोंको, नकरो जुबां ज० ॥ ३ ॥

३५ दिंडी.

सुभेदाराचें वाक्य ऐकुनीयां ॥
क्रोध मात्सर्यें तप्त होउनीयां ॥
धेनु कापिला निजकरें वधायाला ॥
शस्त्र घेउनि नृप कीर्तनांत आला ॥ ॥ १ ॥

---

१ पंढरीक्षेत्र हें दक्षिणेकडे असल्यामुळें तिकडे सर्वांना नेऊन उत्तर देशांतील लोकसंख्या कमी करणें ही. २ गुन्हा. ३ कीर्तनाच्या निमित्तानें. ४ फितूर. ५ वध.

राजा ( नामदेवास ):—

### ३६ साकी.

क्यौं वे काफिर वेली खुषसिे, अपनेको कहलाता ॥
शहानशहा हूं गौपर खुदही, छुरी देख चलाता ॥
जिंदा कर उस्को, इतमिनानि होगा मुझको ॥ १ ॥

### ३७ ओंवी.

शस्त्र घेऊन आपले हातीं ॥ गायीस कापी भूपती ॥
तें पाहून सुज्ञ म्हणती ॥ " कालाय तस्मै नमः " ॥ १ ॥

हा अकल्पित प्रकार पाहून नामदेवास वाटलें कीं,

### ३८ आर्या [ गीति. ]

गोपालनोतिहास-ग्रंथ वहायास हस्ति ना पुरते ॥
गोहत्येचें झालें, आज कसें केंद्र हस्तिनापुर तें ॥ १ ॥

### ३९ ओंवी.

नामदेव म्हणे भूपास ॥ " थांबा तुम्ही चार दिवस ॥
धेनु उठूनि सर्वांस ॥ दूध आपलें पाजवील ! " ॥ १ ॥

चार दिवसांची मुदत देऊन राजा निघून गेला. नामदेवानें प्रभूची करुणा भाकण्यास आरंभ केला.

### ४० पद. [ चाल-उद्धवा शांतवन ]

हे दीनानाथ कृपाळा ! धांवुनि ये श्रीगोपाला ! ॥ ध्रु० ॥
भूप हा सत्व घ्यायाला, करि धेनूच्या प्राणांता ॥
हंबरडा फोडुनि अंतीं, मृत झाली ही गोमाता ॥
तुजविना प्रभो वननीळा ! उठवील कोण तरि आतां ? ॥
चाल:— विघ्न जें कीर्तनीं आलें ॥
तें अपूर्व वाटे झालें ॥
कल्पना न कांहीं चाले ॥

---

१ साधु. २ खात्री. ३ गोरक्षणाविषयींचीं वृत्तांतपर पुस्तकें. ४ हत्ती. ५ भरती झाले नसते. ६ मुख्य स्थान-राजधानीचें. ७ पूर्वी कधींहि न झालेलें.

या कठिण अशा समयाला, धांवुनि ये श्रीगोपाला ! ॥ १ ॥
घेऊन भक्त निजसंगें, वैकुंठीं बसला असशी ? ॥
कीं क्षीरसागरीं देवा ! शेषावरि निद्रा घेसी ? ॥
कीं प्रिय भक्ताचा धांवा, ऐकून धांवुनी जासी ? ॥
चाल:— करि मार्गीं कोण विरोध ॥
गरुडाचा करिसी शोध ॥
मज कांहिं न होतो बोध ॥
तोडूनि सर्व पाशांला, धांवुनि ये श्रीगोपाला ! ॥ २ ॥
प्रल्हाद गांजला जेव्हां, स्तंभांतुनि गुरगुरलास ! ॥
आळवितां ध्रुव बाळानें, त्या दिलेंस अढळपदास ! ॥
भक्तकामकल्पद्रुम तें, जातसे ब्रीद विलयास ॥
चाल:— तूं देवांचा कैवारी ॥
ते देवचि धेनु-शरीरीं ॥
तिज यवनभूप हा मारी ॥
देवांच्या कैवाराला, धांवुनि ये श्रीगोपाला ! ॥ ३
गोकुळांत केली लीला, करि तिचें स्मरण या काळीं ॥
गोवर्धन धरुनि नखाग्रीं, गोवत्सें रक्षण केलीं ॥
ती कोमलता हृदयाची, का दुर्लभ आजचि झाली ?
चाल:— जरि विलंबें झाला आतां ॥
तरि समज हेंच भगवंता ! ॥
धेनूच्या संगें[१] जातां—॥
बघशील तुझ्या नाम्याला[२], धांवुनि ये श्रीगोपाला ! ॥ ४ ॥
" श्रीहरिच्या कीर्तन-रंगीं, साधूंच्या श्रेष्ठ सभेला ॥
येउनी सत्त्व घ्यायाला, भूपानें गोवध केला ॥
फोडिला नामधाऱ्यांनीं[३], तो टाहो व्यर्थचि गेला " ॥

---

१ गायींप्रमाणेंच कालाच्या दाढेंत जातांना. २ मरण पावतांना. ३ वारकऱ्यांनीं.

चालः— कटुवृत्त भावि राष्ट्रास ॥
सांगेल हेंच इतिहास ॥
येईल बाध वचनास ॥

दुर्गति न कधीं भक्ताला, धांवुनि ये श्रीगोपाला ! ॥ ५ ॥
का सांग हेंच बघण्याला, आम्हांस दिलें धाडून ? ॥
तूं मौज विटेच्यावरती, पाहसी उभा राहून ! ॥
दाविलें पाहिजे आतां, गोमातेला उठवून ॥

चालः— देशील न हात कृपेचा ॥
विश्वास तुझ्या नामाचा ॥
दासा नच वाटायाचा ॥

यावया प्रतीति नृपाला, धांवुनि ये श्रीगोपाला ॥ ६ ॥

या प्रमाणें टाहो फोडून नामदेवानें देवापाशीं धरणें धरिलें, तेव्हां त्या भक्तोत्तमाची पुढीलप्रमाणें अवस्था झाली.

## ४१ श्लोक [ मंदाक्रांता. ]

गेल्या नैसर्गिक परि लया सर्वथा क्षुत्पिपासा ॥
केल्या दूती मज गमतसे वाहतां श्रीनिवासा ॥
झाली त्याची समरस तदा भावना पांडुरंगीं ॥
आली नाहीं अजुनिहि दया माधवा अंतरंगीं ॥ १ ॥

## ४२ ओंवी.

एकेक लोटूं लागे दिन ॥ सचिंत बसले सज्जन ॥
परि पुढें येऊन दुर्जन ॥ अद्वातद्वा बोलती ॥ १ ॥

## ४३ पद [ चाल—लावणी. ]

करितोस काय रे ! मुर्खा ! निर्लज्ज टोणग्यापरी ? ॥
तव ' महाराष्ट्र ' हा नोहे, ही नव्हे क्षेत्र ' पंढरी ' ॥

---

१ नहि कल्याणकृत् कश्चिद्दुर्गतिं तात गच्छति-गीता. २ स्वाभाविक. ३ गु[illegible] पहान. ४ निरोप नेणाऱ्या दासी. ५ भलभलते.

(चाल) दाक्षिणची भाकड कथा ॥
इथे अन्यथा ॥
कुणा सर्वथा ॥

नसे पट्टणारी, ही असे ‘हस्तिनापुरी’ ॥ १ ॥
पुरुषार्थ नसे ज्या अंगीं, त्या मरण इथें सत्वरी ॥
करी विचार याचा आधीं, मग खुशाल धरणें धरीं ॥

(चाल) येऊन उद्यां भूपती ॥
गोशवा प्रती ॥
बघुनी दुर्गती– ॥

करिल तव भारी, करिं पोबारा तोंवरी ॥ २ ॥

मुदतीचा शेवटचा दिवस उगवला. त्यावेळीं नामदेवानें देवाला शेवटली हांक मारिली:—

४४ पद. [ चाल—पांडुनृपती ज० ]

धांव ! धांव ! गोपाला ! ॥
पतिता या धेनूला ॥
अमृतमयी दृष्टीला ॥
उघडुनी पहा ! धांव ! ॥ ध्रु० ॥

न तरि अशा समयाला ॥
ब्रीद जाय विलयाला ॥
तूंच विठ्ठला त्याला ॥
जागुनी रहा ! धांव ! ॥ १ ॥

आले मत्प्राण कंठिं ॥
भेट तुझी वैकुंठीं– ॥
घेइल मग जगजेठी ! ॥
नामदेव हा ॥ धांव ! ॥ २ ॥

---

१ असंबद्ध गोष्टी. २ खोल्या. ३ गायीच्या प्रेतास. ४ दुर्दशा. ५ पलायन ६ मरून पडलेल्या.

मुदतीची मार्गप्रतीक्षा, करीत भक्तवत्सल गोपाळकृष्ण कीर्तनांत साथ करीत नामदेवाच्या मागेंच उभा होता !

### ४५ श्लोक [ पृथ्वी. ]

अशी स्वमनिं भाकितां सुकरुणा हरी लागुनी ॥
हळूंच खुणवी करें प्रभु तया तदा मागुनी[1] ॥
" शवींस सखया ! तुझ्या अमृततुल्य लावी करां[2] ॥
उठेल मृत गौतमी, यश मिळे तुला लेंकरा ! ॥ १ ॥

प्रभूची आज्ञा म्हणून नामदेवानें आपल्या पवित्र हस्तानें मृत गोमातेला स्पर्श केला व आनंदानें म्हटलें कीं,

### ४६ पद. [ चाल—पाळणा. ]

जागृत हो आतां, अमृतयुते[3] ! ऊठ ऊठ गोमाते ! जा० ॥ध्रु०॥
निजरसें[4] पाजवि गे ! वत्सांतें, तृप्त करीं क्षुधितांतें[5] ॥
जीवन सर्वांचें, तूं असमी, मग निष्ठुर कां होसी ? ॥
तुजविण विप्राचें, कर्म अडे, क्षात्रिय—बल नच वाढे ॥
त्यापरि कृषिकर्म[6], वैश्यांचें, क्षणहि न चालायाचें ॥
बाळें बाळपणीं, स्वप्राण, त्यजिती तुजवांचून ॥
ऐसें असतां कां, दीनपणें, रुचलें तुजला निजणें ॥
अस्ताव्यस्त तुझी, तनु झाली, भोंवतिं पसरे लाली ॥
धारा लोपुनियां, दुग्धाच्या, चिळकांड्या रक्ताच्या ॥
उडती तिजमधुनी, नराधमां, गोचिंड[7] समजुनि आम्हां; ॥
स्मरण करीं चित्तीं, यमुनेचें, दुःसह त्या समयाचें ॥
डोहीं शिरतांच, सर्पाचें[8]— विष करि हरण असूंचें[9] ॥
झालिस निष्प्राण, त्याकाळीं, करुणा देवा आली ॥

---

१ पाठीमागून. २ हातास. ३ अमृतरस धारण करणारी. ४ दूध. ५ भुकेल्यांना. ६ शेतकीचें. ७ वासरांना दूध व गोचिडांना रक्त असा न्याय आहे. ८ कालियाचें. ९ प्राणाचें. १० गाइच्या प्रेतास

मुरली वाजविली, कृष्णानें, मुरली मनोहरानें ॥
निर्भय जीवन तें, तुज दिधलें, संकट विलया नेलें ॥
त्यापरि यासमयीं, वाजवुनी, वेणू मंजुल-गानीं ॥
तुजला बाहतसे, गोपाल, ऊठ ऊठ तात्काल जा० ॥ १ ॥

### ४७ दिंडी.

स्पर्श करितां प्रेतास नामदेवें ॥
वत्स शोधाया धेनु उठुनि धांवे ! ॥
संत-महिमा ऐकून सुखें डोला ॥
प्रेम भावें गोपालकृष्ण बोला ॥ १ ॥

### ४८ श्लोक [ भु. प्र. ]

महाराष्ट्र संतें खलां लाजवीलें ॥
कर-स्पर्श मात्रें शवा जीववीलें ॥
असें ऐकतां भूप पायीं निघे तो ॥
चमत्कार ऐसा नमस्कार घेतो ! ॥ १ ॥

### ४९ ओंवी.

नामदेव म्हणे देवास ॥ अंतरीं होऊन उदास ॥
एक सारखा चार दिवस ॥ अंत माझा कां पाहिला ? ॥ १ ॥

देव ( नामदेवास ):—

### ५० श्लोक [ पृथ्वी. ]

असेल तव भावना स्वमानिं नामदेवा ! जशी ॥
तसेंच मम लाडक्या ! फळहि शेवटीं पावशी ॥
'स्वभक्त मजला जसा प्रिय तसा न कोणी तुले' ॥
'सदा वचन-बद्ध मी' वचन अर्जुनाला दिलें ॥ १ ॥

### ५१ ओंवी.

भूपती येउन शरण ॥ नामदेवास घाली लोटांगण ॥
म्हणे अन्याय घडला जो दारुण ॥ क्षमा करावा साधोजी ! ॥ १ ॥

---

१ भयंकर.

नामदेवानें, राजा व प्रजा यांचे हिताहितसंबंध परस्पर संलग्न झाल्याशिवाय उभयतांनाहि शांतिसुखाचा लाभ मिळणें दुरापास्त आहे, हें जाणून सर्वांचें कल्याण व्हावें या हेतूनें कल्याणाचें निधान जो ब्रम्हांडनायक राजराजेश्वर भगवान् पांडुरंग त्याची प्रेमभावानें करुणा भाकिली.

५२ पद. [ चाल—माता दिसली स. ]

देवा ! देई सदय सुखाब्धे ! सुमति सतंत नतभालें नृपासी ॥ ध्रु० ॥
धर्म विविधता प्रजाजनांची, स्पर्श करो न मनासी ॥ १ ॥
नसो वृत्ति रममाण अनैतिक, घातुक कुटिलपणासी ॥ २ ॥
राजनिष्ठ ही जनता राहो ! या शुभ वरदानासी ॥ ३ ॥

पूर्वखंड संपूर्ण.

---

१ दयाळो ! २ नेहमीं. ३ नम्र. ४ प्रजाजन भिन्न भिन्न धर्मांचे आहेत ही भावना.

२८३०
दा. क्र.
शाखा

# श्री संत नामदेव.

## ( मध्यम खंड. )

### १ श्लोक [ शा. वि. ]

नामाचा महिमा जनां अनुभवा आणूनि जेव्हां दिला ॥
प्रेमा उत्तर–देश–बंधु–मनिचा तेव्हांच संपादिला ॥
ऐसा लौकिक वाढतां, परतती ते दक्षिणेला पहा ॥
हंसाला पयसा रुचे न सहसा संतांप्रति व्याप हा ॥ १ ॥

### २ ओंवी.

नामदेव म्हणे ज्ञानेश्वरा ॥ चला जाऊं पंढरपुरा ॥
कधीं पाहीन रुक्मिणीवरा ॥ ऐसें वाटे अंतरीं ॥ १ ॥

### ३ अभंग.

नामदेव ऐसें बोले ॥ ज्ञानदेवा हंसूं आलें ॥
मनीं वाटे ज्ञानेश्वरा ॥ काय करावें या पोरा ॥ २ ॥
असूनीयां भक्ति–बळ ॥ राहे कैसी तळमळ ॥ ३ ॥
मासा जीवनींच राहे ॥ कैंवि तळमळ वाहे ॥ ४ ॥
देऊनीयां रुकाराला ॥ आले तेव्हां पंढरीला ॥ ५ ॥

### ४ श्लोक.

विलोकिलें जैं मुख विठ्ठलाचें ॥ न भान त्या स्त्री-गृह वा मुलाचें ॥
मनोगृहीं श्रीहरि ठाण मांडी ॥ प्रपंच-माया म्हणुनीच सांडी ॥ १ ॥

### ५ ओंवी.

उभा राहून गरुडपारीं ॥ प्रेमें नामा कीर्तन करी ॥
वर्णी निरूपणा भीतरीं ॥ थोरवी कीर्तन भक्तीची ॥ १ ॥

### ६ पद [ चाल—भाव धरारे० ]

भ्रांति हरावी ॥ तरि कीर्तन—भक्ति करावी ॥ ध्रु० ॥

द्वितीय साधन कीर्तनभक्ति ॥
समूळ सोडुनि विषयासक्ति ॥
केवळ हरिची पदानुरक्ति—॥
स्वमनिं वरावी ॥ तरि कीर्तनभक्ति करावी ॥ १ ॥

निर्गुणपक्षीं ब्रह्म निरूपण ॥
सगुण हरीचे वर्णावे गुण ॥
सगुण रक्षुनी महती निर्गुण—॥
विस्तारावी ॥ तरि कीर्तनभक्ति करावी ॥ २ ॥

दिव्य चरित्रें हरि—भक्तांचीं ॥
वर्णन करितां श्रोतृजनांची ॥
विस्मृति व्हावी बाह्य, मनाची—॥
वृत्ति मुरावी ॥ तरि कीर्तनभक्ति करावी ॥ ३ ॥

अशी साधतां कीर्तन—भक्ति ॥
आपण होउनि वरि ते मुक्ति ॥
परमार्थाची सोपी युक्ति ॥
नच विसरावी ॥ तरि कीर्तनभक्ति करावी ॥ ४ ॥

### ७ श्लोक [ व. ति. ]

त्या कीर्तनांत जमले बहु साधुसंत ॥
सद्भक्त भाविक तसे भजनी महंत ॥
थोटेच घेउनि निज द्वय भग्न पाणी ॥
गोरा बसे श्रवणिं चिंतित चक्रपाणी ॥ १ ॥

---

१ श्रवणं कीर्तनं विष्णोः....... २ सगुण हरिकथा या नांव कीर्तन । अद्वैत म्हणजे निरूपण । सगुण रक्षूनि निर्गुण । बोलत जावें ॥ श्रीसमर्थ. ३ हात. ४ गोरा कुंभार.

## ८ साकी.

'विठ्ठल विठ्ठल' नामस्मरणीं, वाजविती जन टाळी ॥
गोरोबासी द्वयकर फुटती, तरुला जेविं डहाळी ॥
नमुं त्यां सद्भक्तां, धन्य श्रोता तो वक्ता ॥ १ ॥

## ९ पद. [ चाल–शारदे० ]

पाहुनी, नवल त्या क्षणीं, चकित जन मनीं होउनी जाती ॥
कुटिलांच्या नयनीं क्षणभर लवतिं न पातीं ॥ ध्रु० ॥
हें काय, म्हणाति आश्चर्य, अपूर्वचि होय, जाय ही भ्रांति ॥
कीं टाळकुट्यांनीं काय करावी क्रांति ॥ १ ॥

चालः– श्रीनामदेव वक्ता जो, धन्य हा ॥
श्रोताहि तसा गोरोबा, धन्य हा ॥
किति दिवस आज सोन्याचा, धन्य हा ॥

चा. पू.:– विश्वास धरुनि, सहवास करुनि, संतांस नमावें चित्तीं ॥
करि देविदास ही चिकित्सकांना विनती ॥ २ ॥

## १० ओंवी.

गोरोबा म्हणे संतांस ॥ चलावें तेरढोकीस ॥
पावन करावें खोपटास ॥ कृपा करून माझ्यावरी ॥ १ ॥

## ११ दिंडी.

तेरढोकीसी सर्व संत आले ॥ सदनिं गोऱ्याच्या प्रवेशते झाले ॥
चरण त्यांचे क्षालुनी आसवांनीं ॥ दिवाळीचा सण हाच मनीं मानी ॥१॥

## १२ ओंवी.

गोरोबाच्या दोघी स्त्रिया ॥ घरीं नव्हत्या त्या समया ॥
संतहि बिऱ्हाडें ठेवूनियां ॥ स्नानास आले नदीवरी ॥ १ ॥

## पद १३. [ चाल–लावणीची ]

गुलछब्बु तिथें भटकती नदीच्या तिरीं ॥
ठेवून नजर आपली कामिनी वरी ॥ ध्रु० ॥

तारुण्यभरानें मदोन्मत्त होउनी ॥
देतात मिशांला पीळ बघुन कामिनी ॥ १ ॥
घरिं मातापितरें भीक सदा मागती ॥
हे फुकट खाउनी स्वैर असे वागती ॥ २ ॥
चाल- निर्लज्ज मारिती पतिव्रतांना खडे ॥
स्नानास सर्वदा पडे तयां सांकडें ॥
चळचळां कांपती यावयास त्यांपुढें ॥
चा॰पू॰ करि वारा उडवुनि वस्त्र तयां साधता ॥
चेतवी तयांचा कामानल तत्त्वतां ॥ ३ ॥

## १४ ओंवी.

स्नानें करिती संतजन ॥ सर्वांचें निर्विकार मन ॥
वस्त्रें रक्षाया कारण । कांठीं बसल्या जनाबाई ॥ १ ॥

( एक जनाबाईस ):--

## पद १५. [ चाल–रामकृष्णनरहरे॰ ]

कोण तुम्ही या जनीं, वाइग ! कोण तुम्ही या जनीं ? ॥
असतां कोठें भटकत येथें आलां तरि कोठुनी ॥ ध्रु॰ ॥
लट्ट निरंजन मुनी, कोण हे लट्ट निरंजन मुनी ॥
येथें आले वदा कुणाची पळवायां कामिनी ॥ १ ॥
कोण दुजी जारिणी वाइग । कोण दुजी जारिणी ? ॥
नभो मंडलीं ग्रहांत शोभे जशी चटकचांदणी ॥ २ ॥

## १६ श्लोक [ पृथ्वी. ]

अधोमुख करी जनी परिसुनी खलोद्गार ते ॥
म्हणे स्वमनिं विठ्ठला ‘सुमतिदायका! श्रीपते ! ॥
उपेक्षिसि कसें असें पतित मूढ हें लेंकरूं ? ॥
निवारण कुसंशया धरुनि धैर्य कैसें करूं, ॥ १ ॥

---

१ संकट. २ साधुसंत ( उद्दिष्ट ). ३ उद्दिष्ट मुक्ताबाई.

जनाबाई ( त्यास ):—

१७ पद. [ चाल ( नृपममता० ) ]

वदुं नको अशा वचनाला, करि बोध जरा स्वमनाला, बांधवा ॥
कैलास सोडुनी आला, शिवशंकर भूलोकाला, बांधवा ॥
पाहुनी तयाची लीला, विधि[1] अनुजाचि त्याचा झाला, बांधवा ॥
चालः- निजचित्तिं, सर्व मानिती, वंद्य ज्याप्रति, सद्गुरु 'निवृत्ति' ॥
तोच हा पाहीं, 'सोपान' तसा वय तोही बांधवा ! ॥ १ ॥
प्रत्यक्ष विष्णु अवतरला, पतितास उद्धरायाला, बांधवा ! ॥
पशु-मुखें वेद वदवीला, चालविलें जड भितीला, बांधवा ! ॥
चालः-गीतार्थ, वदे बोधार्थ, लिहुनि 'भावार्थ-दीपिके'-लागीं ॥
श्रीज्ञानेश्वर तो योगी, बांधवा ! ॥ २ ॥
चवदाशें वर्ष वयाला, चुकाविला मृत्युचा घाला, बांधवा ! ॥
त्या चांगदेव शिष्याला, जी लावी सन्मार्गाला, बांधवा ! ॥
चालः- भूतला, पूर्ण चित्कला, शुद्ध निर्मला ॥
जन्म जी घेई, ती माझी 'मुक्ताबाई' बांधवा ! ॥ ३ ॥
घटघटांत ईश्वर भरला, भरुनियां दशांगुलि उरला, बांधवा ! ॥
हा स्वानुभवानें ज्याला, सिद्धांत पूर्ण पटलेला, बांधवा ! ॥
चालः-निजकरीं, विळा जो धरी, चरचरां चिरी, सांठवी हरि-
भ्रमर हृत्कमळीं, ॥ तो संत सांवतामाळी बांधवा ! ॥ ४ ॥
जो सगुण भक्तिचा पुतळा, प्रिय लक्ष्मीहुनि घननीळा, बांधवा ! ॥
प्रभु अंकित झाला ज्याचा, उद्धारक या दासीचा, बांधवा ! ॥
चालः- पाहुनी, पोरकी जनी, निराश्रित जनीं, कृपा ठेवुनी, ॥
राखि जो लाज, श्रीनामदेव गुरुराज, तो पहा ॥ ५ ॥

१८ श्लोक [ शा. वि ]

केलें कीर्तन पंढरींत हरिचें श्रीनामदेवें यदा ॥
गोरोबा तुमचा कुलाल बसला तेथें सुखानें तदा ॥

---

१ ब्रह्मदेव. २ ज्ञानेश्वर. ३ मातृपितृविरहित. ४ जनाबाई.

प्रेमें ‘ विठ्ठल ’ गर्जतांच फुटले गोऱ्यास दोन्ही कर ॥
त्याच्या गेहिं निमंत्रणावरुनि हे आले पहा भास्कर ॥ १ ॥

दुसरा ( पहिल्यास ):—

### १९ पद [ चाल-कधिं करिती० ]

वेद यांच्या काय संगें, ववसी तूं जावया ॥ ध्रु० ॥
पाहुनी, तरुण कामिनी, जासि मोहुनी, इच्छिसी मनीं ॥
तिजासि भोगाया, सुहृदांतें त्यजुनियां ॥ १ ॥
कामिनी, दिल्या सोडुनी, कुलालें जनीं, हात तोडुनी ॥
घेतलें वांयां, लोकिं हंसें व्हावया ॥ २ ॥
कीर्तनीं, ढोंग दावुनी, त्यास फसवुनी, नेति पळवुनी, ॥
तयांच्या जाया, आले त्यां न्यावया ॥ ३ ॥
सर्वथा, भुलुं नको वृथा, त्यजुनि निजपथा, फोल त्या कथा ॥
बरें सुखवाया, तीरें हवा खावया ॥ ४ ॥

### २० श्लोक [ मंदाक्रांता. ]

होता पूर्वीं सरल हृदयी सांवडा जो मनाचा ॥
त्यातें झाला कुटिल कपटी संग त्या दुर्जनांचा ॥
आतां आला परि सहज तो पूर्ण उद्धार-काला ॥
पश्चात्तापें मन निवळतां होतसे नम्र भाल ॥ १ ॥

तो ( सर्वांस ):—

### २१ पद. [ स्वार्थांऽऽऽ ]

मजलाऽऽऽनको अशि मैत्री सर्वथा ॥ ध्रु० ॥
अनीतियोगें अधःपात करि सोडुनि नीति-पथा ॥ १ ॥
अजातरिपु नच, अजातमित्राचि जावो जन्म वृथा ॥ २ ॥
भीष्मादिक दुःसंगें नडले माझी काय कथा ? ॥ ३ ॥

---

१ बाकीचे अधम त्या जनाबाईशीं बोलत असलेल्यांस उद्देशून म्हणतात. २ गोरा कुंभारानं. ३ चमत्कार. ४ नदीचा कांठ. ५ जनाबाईशीं बोलणारा. ६ शत्रु न जन्मलेला. ७ मित्र न जन्मलेला. द्वापारांत धर्मराज अजात-रिपु झाले. मी कलियुगांत अजात-मित्रच राहीन; चिंता नाहीं पण असली मैत्री नको !

### २२ आर्या [ गीति. ]

गोरोबाच्या कांता आल्या घट घेउनी नदीवरुनी ॥
पाहुनि साचिंत पतिला, बोलति त्या कोप निजहृदीं वरुनी ॥ १ ॥

वडील स्त्री ( गोरोबास ):—

### २३ पद [ चाल—माळिण नवी. ]

नाद खुळा असला, प्रपंचीं, नाद खुळा असला ॥
मूर्खपणें लावून घेउनी, व्यर्थ तुम्हीं फसलां ॥ ध्रु० ॥

चाल:— चिखलांत तुडवुनी बाळ जिवें मारिलें ॥
उभयतांस आम्हां व्यर्थ अंगिकारिलें ॥
तोडुनी हात धंद्यास दूर सारिलें ॥

चा. पू:— अजुनि कसा रुसला, दगड तो, अजुनि कसा रुसला ? ।
संसाराचें मातेरें करि, देवाचि तो कसला ? ॥ १ ॥

चाल:— उरली न पिठाची चिमुट आपुल्या घरीं ॥
आणिले कशाला लट्ठ निरंजन तरी ? ॥
आधींच न केला विचार कां अंतरीं ? ॥

चा. पू:— स्वस्थ कसें बसला, असे मग, स्वस्थ कसें बसलां ? ॥
उपद्व्याप हा तुम्हांस कोणीं, सांगितला तसला ॥ २ ॥

गोरोबा ( स्त्रीस ):—

### २४ पद [ चाल—दृष्टिभरे जल. ]

रुष्ट न यापरि होई । गेहीं, अजि कांहीं, कण नाहीं ॥
जा आण कुठुनि तरि बाई ! ॥ ध्रु० ॥
भाग्य आपलें उदया आलें, म्हणुनि गृहाला संत समूहाचि येई ॥ १ ॥
ज्यांच्या संगें कीर्तनरंगीं, पुनरपि हे कर, दोन मला प्रभु देई ॥ २ ॥
सदनिं उपोषित त्यांस न ठेवीं, यास्तव आतां क्रोध लयाला नेई ॥ ३ ॥

### २५ श्लोक [ स्रग्धरा. ]

गोरोबाचें सुखाचें वचन परिसुनी कामिनी त्या रिझाल्या ॥
पाहोनी हात दोन्ही चकित उभयतां अंतरीं फार झाल्या ॥

एकांतीं जाउनी त्या, निजमनिं करिती योजना या परीची ॥
आतां मागूनि घेऊं वराचि बुधजनां 'कांत नांदो! प्रपंचीं ॥ १ ॥

२६ ओंवी.

माहेरींचा सुवर्णमणी ॥ गहाण ठेवून एके सदनीं ॥
उभयतां आल्या घेउनी ॥ शिधा संतासी द्यावया ॥ १ ॥

२७ श्लोक [ व. ति. ]

स्नानें करून मग संत- समूह येतां ॥
देती शिधा सकल त्यांस कुलाल-कांता ॥
मुक्ता जनी जवळि येउनि त्या क्षणासी ॥
दोघी स्त्रिया करिती लांगुल चालनासी ॥ १ ॥

गोरोबाची वडील स्त्री ( जना-मुक्ताबाईस ):—

२८ पद-[ चाल आजि अक्रुर० ]

आजन्म तुम्ही ब्रम्हचारिणी माता, वाटतें नवल हें चित्ता ॥ ध्रु० ॥
कशि सांगू मी हाल मनाचे बाई, धैर्य तें अल्पना होई ॥
परि पसरूनियां, पदर मागत्यें भीक, ती घाला मज निःशंक ॥
चालः— संसार न करितो कांत ॥
मारिलें बाळ चिखलांत ॥
तोडून घेतलें हात ॥
चा. पू.-परि संगतीनें तुमच्या फुटले तेच, प्रत्यक्ष पाहिलें साच ॥ १ ॥
घरिं असुनि पहा दोघि नांदत्या आम्ही, परि अडचण त्यास रिकामी ॥
मी घात असा आपण होउनि केला, पति मुकला संसाराला ॥
ही वहिण सदा झाली तशि हैराण, ये आड विठूची आण[1] ॥
चालः— निंदिती लोक गांवांत ॥
परि धरुनी जीव मुठींत ॥
कंठितों काळ सदनांत ॥
चा. पू :-पति लावावा आतां संसाराला, होउंद्या वृद्धि वंशाला ॥ २ ॥

---

१ अंगाला हात लावूं नका म्हणून गोरोबाला श्रीविठ्ठलाची आण घातली आहे.

### २९ ओंवी.

संतांस कळला समाचार ॥ गोऱ्यानें सोडिला संसार ॥
सर्वांनीं केला विचार ॥ मन वळवावें काकाचें ॥ १ ॥

गोरोबा ( संतास ):—

### ३० आर्या [ गीती. ]

स्वस्थ तुम्हीं जेवावें, गोड करावें गरीव हें अन्न ॥
साधें परि तें प्रेमें, चित्तीं वाटेल पंचपक्वान्न ॥ १ ॥

नामदेव ( गोरोबास ):—

### ३१ श्लोक [ पृथ्वी. ]

तुम्हां शपथ घातली सदनिं विठ्ठलाची जरी ॥
दिले प्रभुवरें पुन्हां कर दुजे तुम्हांला, तरी ॥
प्रपंच मुळिं टाकणें उचित कृत्य आतां नसे ॥
स्ववंश नच वाढणें रुचतसे मनाला कसें ? ॥ १ ॥

गोरोबा ( संतास ):—

### ३२ पद—[ चा० कधिं तिला० ]

कर दिले मला प्रभुनें, मुळिं नच व्हाया वश मदनें ॥ ध्रु० ॥
विषय—सेवनीं मर्यादेनें, [1]लाजाविणें तरि का पशूनें ॥ १ ॥
निजकाया अर्पाया पद तुमचे सेवाया ॥
भजन कराया शुद्ध मनें ॥ २ ॥

सांवता ( गोरोबास ):—

### ३३ श्लोक—[ पृथ्वी० ]

अमोल निजयोग्यते परिच बोलला वैखरी ॥
परी उलट घालितो शपथ विठ्ठलाची खरी ॥
कराल नच मान्य ही विनति आमची जोंवरीं ॥
करूं ग्रहण अन्न हें न कण मातही तोंवरी ॥ १ ॥

---

१ पशूंच्या विषयसेवनांत मर्यादा तरी असते.

गोरोबा ( संतांस ):—

### ३४ आर्या [ गीति. ]

मान्य तुम्हां संतांसी, त्यापरि माझ्याहि रुक्मिणीकांता ॥
तरि आज्ञा म्हणुनी मी, ह्या दोघी अंगिकारितों कांता ॥ १ ॥

### ३५ अभंग.

आनंदी आनंद झाला कामिनीसी ॥ दया विठ्ठलासी आली त्यांची ॥१॥
घडतांच हातें अल्पसंतसेवा ॥ समाधान जीवां झालें त्यांच्या ॥२॥
सर्व मिळुनियां करिती भोजन ॥ प्रभुनें विंदानें केलें तेव्हां ॥ ३ ॥
रांगतचि आलें गोरोबाचें पोरें ॥ दुधांत साखर पडलीसे ॥ ४ ॥
देवीदास म्हणे भाग्य किती थोर ॥ करा जयजयकार प्रेमें त्यांचा ॥५॥

### ३६ ओंवी.

झालें प्रेमाचें भोजन ॥ व्हाया नामदेवाचें कल्याण ॥
एकांतीं काकां लागून ॥ बोलती वचन ज्ञानेश्वर ॥ १ ॥

ज्ञानेश्वर ( गोरोबास ):—

### ३७ पद [ चाल—अर्जुन तरि. ]

भक्त हरीचा कंठमणी हा नामदेव आगळा ॥
होतां ज्याचा विरह तयाचा दाटुनि येतो गळा ॥ ध्रु० ॥
चित्त जयाचें निर्मल अतिशय सद्भक्तीचा मळा ॥
निष्काम प्रेमाचा वाहे झरा तिथें झुळझुळा ॥ १ ॥
वसंतऋतु तो नियमित येतो हरि—मनिंचा कळवळा ॥
रसना गाते नाम हरीचें मंजुरवें कोकिळा ॥ २ ॥
सर्व सिद्धता अशी असुनियां परिणामीं निष्फळा ॥
ज्ञानबीज नच अजुनि पेरिलें पहा कसा हा खुळा ॥ ३ ॥
धानिक सद्गुरू पुरविं न जोंवरी कृपा—संपदा ळळा ॥
निर्धनता—मायेचा नुकले, तोंवरि दुर्धर पिळा ॥ ४ ॥
द्यावी करुनी काका याप्रति याची जाणिवकळा ॥
होईल तेणें दूर समूळाची तळमळिची अवकळा ॥ ५ ॥

---

१ लीला. २ चिखलांत मेलेलें. ३ गोरोबास.

ग्रंथ ... नं. ...

### ३८ श्लोक [ व. ति. ]

झाला प्रसाद तरि सद्गुरुचा कुणाला
घे थापटी स्वकरिं हेंच पहावयाला ॥
एकेक पक्कहि, अपक्क घटा परीक्षी ॥
पाहे चमत्कृति तदा रवि अंतरीक्षीं ॥ १ ॥

### ३९ दिंडी.

हळुंच गोरोबा जवळ येत जेव्हां ॥ दकचला बहु तो नामदेव तेव्हां ॥
उठुनि वेगानें दूर पळूं लागे ॥ वदे काकासी वचन तदा रागें ॥ १ ॥

नामदेव ( गोरोबास ):—

### ४० पद [ म्हातारा इतुका. ]

काय असें करितां, काका ! किंतु न मनिं धरितां ॥ ध्रु० ॥
निमंत्रितांतें अवमानाया, कर नच सांवरितां ॥ १ ॥
ज्ञानरवीच्या किरणिं आटली, प्रेमाची सरिता ॥ २ ॥
प्रभुच्या पुढती अन्य कुणाची, महति स्वीकरितां ॥ ३ ॥
तत्स्मरणाविण आयुष्याचा, क्षणहि न जाय रितां ॥ ४ ॥
अपक्क म्हणतां विचार आधीं, केला कां पुरता ॥ ५ ॥

नामदेव ( संतांस ):—

### ४१ पद. [ हा काय तु० ]

अपमान हा मी विदित कराया जातों पंढरिला ॥
वृत्त सांगुनी पुसतों आधीं माझ्या श्रीहरिला ॥
पक्कपणा काय उणा, अघहरणा, भवतरणा ॥
हा नामदेव कां पूर्णपणानें, अजुनि न उद्धारिला ? ॥ १ ॥

### ४२ श्लोक.

रुसुनि तो स्वजनांवरि चालला ॥ बघुनि संतसमूहहि डोलला ॥
परि जनीस न हें रुचलें कदा ॥ अनुसरे झणिं ती गुरुच्या पदा ॥ १ ॥

---

१ माध्यान्हकाल २ शंका. ३ व्यर्थ

गोरोबाची स्त्री ( पतीस ):—

### ४३ पद. [ हटातटानें. ]

काय तुम्हांला हौस वाटली हिणवायाची अशी ॥
मूढ मी बोलुं तरि हो कशी ? ॥ ध्रु० ॥
कीर्तनिं ज्याच्या प्रभुरायानें, हात तुम्हांला दिलें ॥
काय हें ऋण त्याचें फेडिलें ! ॥ १ ॥
महत्त्व त्याचें तुम्ही आपल्या तोंडानें वर्णिलें ॥
घडितचि सर्वहि का विसरले ? ॥ २ ॥
चालः— ही व्यवहाराची रीत कशी मोडिली ? ॥
बाजूहि काय परमार्थाची जोडिली ? ॥
आर्धीच करुनि मग संगत कां सोडिली ? ॥
( चा. पू. ) मुग्ध असे कां संत तुम्ही हो कृतघ्नता साहुनी ॥
वाटतें नवल तुम्हां पाहुनी ॥ ३ ॥

ज्ञानेश्वर ( गोरोबाच्या स्त्रीस ):—

### ४४ श्लोक [ पृथ्वी. ]

कृतघ्न नच होउनी पति तुझा तया बोलला ॥
वृथा न वच ऐकुनी बुधसमूह हा डोलला ॥
नसे गुरुविणा गति प्रकट मार्ग हा दाविला ॥
प्रदर्शुनि कृतज्ञता उलट धन्यता पावला ॥ १ ॥

### ४५ ओंवी.

नामदेव येतां राउळीं ॥ क्षेमालिंगन दे वनमाळी ॥
भक्तास पुसे त्या काळीं ॥ म्लान वदन कां जाहलें ? ॥ १ ॥

नामदेव ( देवास ):—

### ४६ पद. [ चाल—नका टाकून० ]

नको नको जगांत जिणें देवा ! मनास ताप भारी ॥ ध्रु० ॥
साहवेना असह्य हाय धिःकार नित्य दुःखकारी ॥
संत गोरा थापटीनें पक्क नाहीं म्हणूनि काय मारी ॥ १ ॥

देव ( नामदेवास ):—

४७ ओंवी.

धन्य गोरोबाची विरक्ति ॥ तुजला प्राप्त व्हाया मुक्ति ॥
त्यानें योजिली योग्य युक्ति ॥ केलें बहु चांगलें ॥ १ ॥

नामदेव ( देवास ):—

४८ पद. [ रा. सोहनी. ता. त्रिवट. ]

पाषाणहृदय तूं गमसी ॥ ध्रु० ॥
सर्वस्वावरि सोडुनि पाणी ॥
शरण रिघावें या समचरणीं ॥
उलट तुझी परि दिसते करणी ॥
काय म्हणावें तुजसी ॥ १ ॥
दुःखभार हा उतरायाला ॥
तुजविण नाहीं स्थळ आम्हांला ॥
पदोपदीं मज सांग विठ्ठला ॥
अंत असा कां बघसी ॥ २ ॥

४९ आर्या.

शोषुनि कंठ रडे तो, बाळ जसा दूर लोटितां माय ॥
तो नामदेव तैसा देवावरि रुसुनि मोकली धाय ॥ १ ॥

देव ( नामदेवास ):—

५० पद [ चाल–तूं टाक चि० ]

करुं नको वृथा हा राग, धरीं अनुराग ॥
मी भ्रमर हृदय तव कमल भाव तो त्यांतिल शुद्धपराग ॥ ध्रु० ॥
अवतार रामकृष्णाचे—॥
जे स्मरण करीं तूं त्यांचें ॥
गुरु वासिष्ठ सांदीपनिचें ॥
शिष्यत्व जाहलें भाग, अंतरीं धरूनी पूर्ण विराग ॥ १ ॥

लागेल मनाला ऐसें ॥
बोलेन लाडक्या कैसें ? ॥
मी वर्तन केलें जैसें ॥
निःशंकपणानें वाग, तसा तूं सद्गुरु-चरणीं लाग ॥ २ ॥

नामदेव ( देवास ):—

### ५१ श्लोक. [ मालिनी. ]

खचित खचित तूं जें बोलसी पांडुरंगा ! ॥
पटत पटत माझ्या चाललें अंतरंगा ॥
करुनि करुणता त्या साधना निर्गुणाच्या ॥
शरण चरणिं जाऊं सांग आतां कुणाच्या ? ॥ १ ॥

देव ( नामदेवास ):—

### ५२ ओंवी.

नागनाथ-मंदिरीं औंढ्यांत ॥ ' विसोबा खेचर ' नामें संत ॥
सद्गुरु मानूनी तयाप्रत ॥ हो शरणांगत नामदेवा ! ॥ १ ॥

### ५३ श्लोक [ व. ति. ]

तो नामदेव झणिं येउनि मंदिरीस ॥
पाहे विलोकुनि तदा गुरु खेचरास ॥
तो वृद्ध साधु पहुडे, न चले उपाय ॥
देवावरी, म्हणुनि, ठेवुनि दोन पाय ॥ १ ॥

नामदेव ( स्वगत ):—

### ५४ पद. [ चाल—येरे गरुडा० ]

अहाहा ! विपरीत नर असला, सद्गुरु होईल तरि कसला ॥ ध्रु० ॥
ठेवुनी वरि निज चरणाला, तुडवी मदें त्रिनयनाला ॥ १ ॥
आज हा प्रथम ग्रासाला, मक्षिकापात पहा झाला ॥ २ ॥
काय गुरु मानूं मत्ताला, विस्मय वाटे चित्ताला ॥ ३ ॥
व्यर्थ का चाळविलें मजला, विठ्ठला ! काय म्हणूं तुजला ? ॥ ४ ॥

---

१ औंढ्या नागनाथाच्या. २ शंकराला.

नामदेव ( विसोबा खेचरास ):—

५५ पद. [ चाल—हा काय० ]

श्रीशंकरास कां अवमानाया नास्तिक्यें धजला ? ॥ ध्रु० ॥
मत्त होउनी निज पद ठेवुनि त्यावरि कां निजला ? ॥
विबुधवरा! विदित करा, मनिं न धरा राग जरा ॥
कीं बुद्धिभेद व्हावया चमत्कृति दाखवितां मजला ॥ १ ॥

वि. खे. ( नामदेवास ):—

५६ पद. [ चाल—भूपति खरें. ]

करूं नये कुणाचा [१]बुद्धिभेद, साद्यंत ॥
गीतेंत बोलला अर्जुनास भगवंत ॥ ध्रु० ॥
हें मान्य मला, शंका न धरी तूं कांहीं ॥
परि [२]बुद्धिभेद तो अभिप्रेत मज नाहीं ॥
( चाल ) मी वृद्ध शरीर न माझें चालतें ॥
पायाचें मजला ओझें, नुचलतें ॥
करि तुझ्या मनाला जें जें, वाटतें ॥
( चा. पू. ) पद ठेव ज्यास्थळीं नसेल ही शिवपिंडी ॥
स्थळ मात्र काढ शोधून असें ब्रम्हांडीं ॥ १ ॥

५७ श्लोक [ मालिनी. ]

स्वरूप गणुनि ज्याचें पातला ईश्वराचें ॥
फर फर फर ओढी पाय त्या खेचराचे ॥
उचलुनि पद ठेवी भूमि मानूनि जेथें ॥
प्रगटाचि शिवपिंडी होइ तात्काल तेथें ॥ १ ॥

नामदेव ( स्वगत ):—

५८ आर्या [ गीति. ]

सद्गुरुनाथ विसोबा, वेदांत ज्ञानसार खेंचर हा ॥
पदकमलिं मनोभ्रमरा ! हरिच्या, याच्याहि सारखेच रहा ॥ १ ॥

---

१ न बुद्धिभेदं जनयेत् अज्ञानां कर्मसंगिनाम्.—गीता. २ उद्दिष्ट. तो बुद्धिभेद करणार नसून बुद्ध्यंतर्गत जो भेद तो काढून टाकावयाचा आहे.

नामदेव ( विसोबा खेचरास ):—

५९ पद. [ चाल—मित्रा मम० ]

शरण शरण मी अनन्य सद्गुरो ! पदा ॥
हृदयींची तळमळ ही जाय तापदा ॥ ध्रु० ॥
नेणुनि अधिकार वृथा श्रम तुला दिलें ॥
उलट मला ब्रह्मरूप विश्व दाविलें ॥
परिस करी हेम, बळें लोह लगटलें ॥
आली करीं आज खरी मोक्षसंपदा ॥ १ ॥
शरण शरण मी अनन्य सद्गुरो ! पदा ॥ ध्रु० ॥

६० श्लोक [ व. ति. ]

नामा रिघे शरण सद्गुरु खेचरातें ॥
तेव्हां बघे हृदयिं त्या जगदीश्वरातें ॥
जाऊनि सर्वहि लया मनिचा विरोध ॥
झाला तया सगुण-निर्गुण तत्त्वबोध ॥ १ ॥

मध्यमखंड संपूर्ण.

# श्री संत नामदेव.

## ( उत्तर खंड. )

### १ आर्या [ गीति. ]

श्री नामदेव-चरितीं, विस्तृतसा ' धर्म भागवत ' परिसा ॥
परिसापरि साजे जो, लोहा नामेंचि ' भागवतें परिसा ' ॥ १ ॥

### २ आर्या [ गीति ]

परिसाभागवत-स्त्री आली स्नानास चंद्रभागेस ॥
घट घेउनी जलाचा, मार्गीं राजाई भेटली तीस ॥ १ ॥

### ३ कटाव.

परिसाभागवताची कांता, भीमरथीच्या स्नानाकारितां,
थाट करुनियां निघे तत्वतां, लक्ष्मीनें शिरिं धरिलें हाता,
विलया नेली तद्दरिद्रता, लाजविते गर्भ-श्रीमंता,
काय उणें मग श्रीमंतीला, अन्नवस्त्र त्यापरी नगाला,
दासीबटकी तिच्या पदाला, तत्पर असती सेवायाला,
वरवर झेलिति प्रति शब्दाला, ' हांजी हांजी ' घोष चालला,
ठेवुनि अनुसंधान कथेचें, वर्णन करणें त्या थाटाचें,
करील रंजन हें श्रोत्यांचें, कीर्तनांत शृंगार रसाला,
अर्धचंद्र तो पाहिजे दिला, म्हणुनि समर्थें कटाक्ष धरिला,
वचन तयांचें ध्यानीं आणुनि, तत्पर मी जों होय वर्णनीं,
हास्यरसाच्या तैलावर्णीं, शृंगाराचें जल लोपवुनी,

---

१ नामा तयाचा किंकर । तेणें केला हा विस्तार ॥ तुकाराम. २ ऐका. ३ नांवानेंच-नुसतें नांव परिस, पण अधिकार लोहाचाच. ४ परिसा भागवत, यानें रुक्मिणीला प्रसन्न करून परिस मागून घेतला होता. ५ नामदेवाची स्त्री.

प्रवृत्त झालों वर्णायातें,
तरुण स्त्रीचें यथार्थ वर्णन,
तेंच तेंच दृष्टांत-समर्पण,
स्तंभ उरूचा भाग, शोभते
त्या सौंदर्यी अल्पना व्यंग, ती
वदनीच्या दंताची हारी,
अरुणाची जणुं छटाच गमली,
कळी असें तें सुंदर नासिक,
भालीं रेखिव कुंकुमसुतिलक,
यापरि तें उपमेय तसें त्या
नेत्र, वदन, कर पदावयव हे,
प्रति अवयव अभिमाना वाहे,
यांतुनि एकहि सौंदर्याची,
अल्पविभागी नव्हती साची,
जाय उलटुनी तनुचें यौवन,
सांखळ्याहि नवशें भाराच्या,
धारा निघती तैं रक्ताच्या,
उलटे नंदादीप लावले,
वात पहा भरभक्कम शिरला,
स्थूलपणा जडपणें पातला,
सह्याद्रीला हिणवायाचा,
उलट पाहुनी तो तरुणीचा,
विचार झाला ठाम तयांचा,
नित्य करावा आश्रय साचा,
तीन हात होता लांबीचा,
थेट नखापर्यंत घालुनी,
दहा दहा तीं कांच कांकणें,
वीस वीस तोळ्यांच्या केल्या,
हात लोंबतो सोंड हत्तिची,
तीं न पुरी अवयवास झांकी,

तरुणस्त्रीच्या त्या थाटातें,
कवितेचें परि पुनरावर्तन,
पदतल संध्याराग, कर्दळी,
कटि केसरिची, तनु कृशांग,
कंबुग्रीवा, कुंद कळ्यापरि,
अधर, कपोलीं, आली लाली,
चांफ्याची नुकतीच उमलली·
वक्र भ्रुकुटी धनुष्यापरी,
कुटिल केश सौभाग्य-विभूषण
उपमानाचें चर्वितचर्वण,
यांत सर्वदा स्पर्धा राहे,
'मज कमलाची समता आहे',
कांता परिसाभागवताची,
काय करूं तें स्वरूप वर्णन,
पदीं विरोद्या तसे जोडवे,
रुतुनि कड्या चालतां तयांच्या,
म्हणुनि बांधिल्या चिंध्या खालीं,
पाय तसे ते दिसूं लागले,
त्या योगानें तिच्या तनूला,
नेसे काळ्या चंद्रकळेला,
भाग रुंदसा तिच्या कटीचा,
संघ पळाला वनिं केसरिचा,
निर्भय होउनि याच कटीचा,
कंबरपट्टा वरि सोन्याचा,
वेढ मुद्या मोहरा, अडकणी,
तोटीचा गडु उजव्या हातीं,
वरि सोन्याच्या गोठ, पाटल्या,
दंडकडीं पस्तिस तोळ्यांची,
अडिच खणाची अंगिं कंचुकी,
गळ्यांत दाटी दागिन्यांची,

माळ एकशें आठ मण्यांची,
सूत्र, गळसरी नवतोळ्यांची,
कृष्णमण्याची पोत गळ्याची,
दंतपंक्ति ती शुभ्र मूळची,
स्पर्धा करिते कृष्णकचाची,
त्यापरी पांचवें उथळ भाल,
म्हणुनी नासिक भागही जरा,
नथ नाकींची दिसे फांकडी,
दोन्ही कानीं डुजुरखुगडी,
म्हणून झालें फार चांगलें,
कर्णाची तिज देणगी दिली,
सौभाग्याचें चिन्ह आगळें,
कपाळभर तें कुंकु लाविलें,
दिग्दर्शन तें व्हाया त्याचें,
पाव पाव इंची खोलीचे,
'कृतांतकटकामलध्वजजरा'
तिच्या भयानें त्रस्त होउनी,
बद्धपणा हा दुःसह पाहुनि,
'बद्धपणानें हेमभूषणीं,
याहुनि बरवें पतन घडावें,
वायुसंगें स्वैर उडावें,
नित्य निरंतर बद्धपणाचा,'
म्हणुनि हळूं मग त्या केसांनीं,
करुनी निःस्पृह वृत्ति मनाची,
केंस शिरीचे अर्ध राहिले,
होते तितके घट्ट बांधिलें,
तिनें झांकिला केंसावरती,
केल्या इतक्या आटाआटी,'
तिच्या युक्तिच्या काथितों गोष्टी,
कालानें निष्ठुरता वरिली,

चंद्रहार वज्रटीक, मंगळ-
श्रीमंतीला उणीव थोडी,
होय तेवढी अडचण तीची,
संगति होता दांतवणाची,
ओंठ, हनुवटी, दोन गाल,
या आश्रय होता पंचवटीचा,
गेला नव्हता त्र्यंबकेश्वरा,
दिली तिला हिरकणीची जोडी,
घोंस बाळ्या, सोनारानें कान टोंचिलें,
काय लाडकी हत्तिण झाली,
म्हणुनी धात्यावरि ती रुसली,
ध्वजेप्रमाणें फडकुं लागलें,
कृपादान जें श्रीलक्ष्मीचें,
तोंडावरती वण देवीचे,
वयोमान तें पाहूनि चतुरा,
करूं लागली शिरीं विहारा,
आवळुनी ती बांधी वेणी,
विचार केला कित्येकांनीं,
नको नको या उच्चस्थानीं,
मनास वाटे तिथें पडावें,
मान नको हा श्रेष्ठत्वाचा,
सूक्ष्म शब्द हे पडतिल कानीं,
आशा सोडुनि मानधनाची,
स्थान सोडिलें आप-आपलें,
दर्पणांत मग तिनें पाहिलें,
केकत तैसा केवडाहि तो,
गमेल कोणा 'शोभे साठीं,
कल्पनाच ती आहे खोटी,
वृद्धपणाच्या आपत्कालीं,
पांडुरला तिजवरी फेंकिला,

म्हणुनि योजना ऐसी केली, जणूं ढाल, तरवार झांकिली,
असा करुनियां थाट अंगना, चालूं लागे तेव्हां स्नाना,
गजगतिचा दृष्टांत पुरेना, वराति गजाच्या जी अंबारी,
पदोपदीं ती डोले ज्यापरि, तशी चालली पथाभीतरीं,
श्रीमंतांची, स्त्री परिसाभागवताची ॥

## ४ ओंवी.

श्रीमंती पाहून तिची ॥ वृत्ति आतुर राजाईची ॥
हळूंच वासना स्वमनींची ॥ प्रगट करी तिजपाशीं ॥ १ ॥

राजाई ( कमळजेस ):—

## ५ पद. [ चाल—आजि अक्रुर हा. ]

काशि फेडूं मी, हौस मनाची बाई ? जवळीं न एक शिवराई ॥ ध्रु० ॥
पति माझा तो साधि असा पुरुषार्थ, तिळहि न ज्यामधें अर्थ ॥
गरिबीनें मी गांजुन गेलें भारी, तळमळही व्यर्थचि सारी ॥
( चाल ) पतिपुढें होय निरुपाय ! ॥
तुहिं केला काय उपाय ? ॥
धरिलेंत कुणाचे पाय ? ॥
(चा.पू.) मज सांगावें गुह्य सोडुनी शंका, निश्चयें राव करि रंका ॥ १ ॥

कमळजी ( राजाईस ):—

## ६ श्लोक ( व. ति. )

भक्तां कफल्लेक करी विठु फार मेला ॥
केलें प्रसन्न म्हणुनी पतिनें रमेलां ॥
केला तिनें परिस अर्पण तैं तयाला ॥
गेला क्षणांतचि दरिद्रपणा लयाला ॥ १ ॥

राजाई ( कमळजेस ):—

## ७ श्लोक ( पृथ्वी. )

असे परिस तो कसा मजसि पाहुं दे एकदां ॥
न किंतु धरि मानसीं गुज न सांगतां ये कदां ॥

---

१ परिसाभागवताची स्त्री. २ भिकारी. ३ लक्ष्मीला. ४ शंका.

मदर्थ करुनी दया क्षण वियोग त्याचा सहीं[1] ॥
उद्यांच करितें पहा परत जाण विश्वास हा ॥ १ ॥

८ ओंवी.

परिस घेऊन राजाई ॥ त्वरें गृहीं परत येई ॥
हातीं घेऊनियां सुई ॥ घांसून पाही त्यावरी ॥ १ ॥

९ दिंडी.

स्पर्श होतां परिसास हेम झालें । नवल ऐसें पाहून चित्त धालें ॥
कसुनि पाही ती घेउनी कसोटी । हर्ष तेव्हां मावे न तिच्या पोटीं ॥१॥

१० ओंवी.

इकडे पांडुरंग मंदिरीं ॥ नामदेवाशीं हितगुज करी ॥
निष्काम भक्तिची अंतरीं ॥ पाही परीक्षा कसून ॥ १ ॥

देव ( नामदेवास ):—

पद ११. [ चाल—तस्कारा हातीं. ]

प्रेम तुज माझें, अनुपम जें जडलें, वाटतें निधान सांपडलें ॥ ध्रु० ॥
संतपद[2] घ्याया, जन जरि धडपडले, मुखें वेदांताहि बडबडले, ॥
लोहपिष्ठाच्या भक्षियें देह झडले, सांग का वाटेवर पडलें ? ॥
मान, धन, त्यांना, पदोपदीं नडले, म्हणुनियां तें[3] नच आतुडलें ॥
नामदेवा ! हें नवल पहा घडलें वाटतें निधान सांपडलें ॥ १ ॥

१२ श्लोक [ भु. प्र. ]

असें गौरवाचें वदे वाक्य देव ॥ तदा ऐकितां रुष्टला नामदेव ॥
मदें[4] अधःपात होईल साच ॥ निघे तेथुनी जाणुनी हें तसाच ॥१॥

१३ ओंवी.

नामदेवाचा धरून कर ॥ जवळ वसवी शारंगधर ॥
प्रेमें उचंबळे हृत्सागर ॥ भक्त शशीतें पाहुनी ॥ १ ॥

---

१ सहन कर. २ संतपद. ३ लाधलें. ४ अभिमानानें.

नामदेव ( देवास ):—

१४ श्लोक [ शा. वि. ]

देवा ! कां वद गौरवूनि मजला तूं बोलसी या परी ॥
झालेली परिसोक्ति वर्णनमिषें शोभेल कां खापरीं ? ॥
मी आधींच विमूढ किंकर तुझा सीमा न मत्पातकां ! ॥
त्यामाजीं मज गौरवूनि करिसी, माझा अधःपात कां ? ॥ १ ॥

देव ( नामदेवास ):—

१५ श्लोक [ शा. वि. ]

पापी तो नर जाण हे प्रियसख्या ! 'पापी' वदे जो तुला ॥
आहे माद्विषयीं तुझ्या हृदयिं त्या प्रेमास नाहीं तुळे ॥
मोठा दुर्लभ लाभ हा मज असे वास्तव्य हृत्संपुटीं ॥
होऊं देऊं नको वियोग सहसा होईन रे हिंपुटीं ॥ १ ॥

देव ( नामदेवास ):—

१६ श्लोक [ व. तं. ]

जाऊं नकोस सदनीं अजि भक्तराया ! ॥
कांता प्रयत्न करि चित्त तुझें हराया ॥
न्याया लयाप्रति तुझ्या विपदार्पदासी ॥
नांदे रमा बनुनि पूर्ण तिचीच दासी ॥ १ ॥

नामदेव ( देवास ):—

१७ आर्या [ गीति. ]

कमलां प्रभा प्रभातीं 'प्रियकर' तशि म्हणति बायका 'कमला' ॥
कमलां-काय श्रमला हंसाहुनि थोर काय काकं मला ? ॥ १ ॥

१८ श्लोक [ पृथ्वी ]

प्रकार परि पाहुनी प्रगट पूर्ण पापांतला ॥
निरोप मग घेउनी सदनिं भक्त तो पातला ॥

---

१ तुलना. २ कष्टी. ३ दारिद्र्यरूप दैन्यास. ४ लक्ष्मी. ५ कमलपुष्पाला ६ सूर्यप्रकाश. ७ लक्ष्मी, संपत्ति. ८ रुक्मिणीचें शरीर. ९ कावळा.

दे नमुनि कामिनी तंव सहर्ष त्याच्या पदा ॥
प्रपंच-रत पामरी, पतिहुनि प्रिया संपदा ॥ १ ॥

राजाई ( नामदेवास ):—

१९ पद. [ चाल—तुज मी शरण० ]

पतिराज! सुखदिन आज गृहिं पाहिला ॥
दारिद्र्यतमाचा त्रास दूर राहिला, पति० ॥ ध्रु० ॥
सौख्य जोडा नाद सोडा यापुढतीं पहिला ॥
दुशाल ओढुनि, खुशाल मिरवा, नका उपेक्षूं व्यर्थ हिला ॥ १ ॥
प्रभु-पद मात्र, नच अणुमात्र कधिं हृत्पात्र ॥
लक्ष्मीच आजपासून देव भजनाला ॥ २ ॥

नामदेव ( स्त्रीस ):—

२० श्लोक [ शा. वि. ]

वेडे! बोलसि तूं भ्रमें भ्रमुनियां ना बोधिसी कां मना ? ॥
नाहीं शाश्वत सौख्यदायक तुझी क्षुद्रा अशी कामना ॥
देवाचें पदपंकज त्यजुनि तूं कां वर्णिसी गे! मलां ॥
कोठें सांग रमा श्रमार्त बसली दाखीव वेगें मला ॥ १ ॥

२१ श्लोक.

उठुनि घेउनि सत्वरि पातली ॥ परिसरूप रमा स्वगृहांतली ॥
म्हणत गेहिं कुबेरचि नाचतो ॥ करि चमत्कृति जो मणि हाच तो ॥ १ ॥

नामदेव ( स्त्रीस ):—

२२ अभंग [ अं. गीत. ]

बाळगिला हा परिस कशाला ? ॥ काय लाविसी अग्नि गृहाला ? ॥
सांग कुणीं तरि फसवुनि तुजला ॥ केला घात तुझा ॥ १ ॥
परिस कशाचा दुर्वह कांटा ॥ परमार्थाच्या मुकवी वाटा ॥
याहुनि बरवा जन्म करंटा ॥ जाइल जरि माझा ॥ २ ॥

---

१ प्रपंचांत रममाण होणारी पामर स्त्री राजाई. २ आवडती. ३ राजाईला. ४ हलकी. ५ चिखलाला. ६ श्रमानें पीडित झालेली.

राजाई ( नामदेवास ):—

२३ पद. [ चाल—सुटला पितृदि० ]

परिसा भागवतानें केलें, निजतप पूर्णत्वाला नेलें ॥
तात्काळ याच जन्मांत फळाला आलें ॥
स्वप्रसाद द्याया देवीचें मन वळलें ॥ १ ॥
करुणा जगदंबेनें केली, दुस्थिति सारी विलया नेली ॥
वरदान द्यावया प्रसन्न होउनि आली ॥
देणगी त्यास परिसाची देती झाली ॥ २ ॥
मुकतां व्यर्थ कशाला स्वार्था, लागो आग तथा परमार्था ॥
लागता काय त्या भिकारड्यांच्या पंथा ॥
त्यामुळेंच न पडे खंड घरांत अनर्था ॥ ३ ॥

नामदेव ( स्त्रीस ):—

२४ श्लोक [ भु. प्र. ]

कशी गे तुझी बुद्धि झाली विकारी ॥ वृथा मानिसी विठ्ठलातें भिकारी ॥
जिला वर्णिसी ती रमा तत्पदासी ॥ चुरी सर्वदा होउनी नम्र दासी ॥१॥

२५ ओंवी.

परिस घेऊन सत्वर ॥ नामा पडे घराबाहेर ॥
निस्पृहपणानें अति दूर ॥ चंद्रभागेंत तो फेंकिला ॥ १ ॥

परिसाभागवत ( स्त्रीस ):—

२६ साकी.

पत्नि ! प्राणापरिस प्रिय तो, परिस कुठें मज दावी ॥
त्याविण भार्ये ! या समयाला, गोष्ट दुजी न वदावी ॥
आतां व्यर्थ जिणें, लोकीं बहु लाजिरवाणें ॥ १ ॥

२७ आर्या [ गीति. ]

परिस-वियोगें स्त्रीला, वदला संतप्त बनुनि धनदास[1] ॥
वाटे तिजला तेव्हां काय पुढें पाहतें निधनदास[3] ॥ १ ॥

---

१ देवाच्या. २ द्रव्यांचा किंकर-परिसाभागवत. ३ काळास-यमास.

२८ आर्या [ गीति. ]

परिसाभागवताची कांता पतिला वदे, तदा, " परिसा[1] ॥
परि साहुनि क्षमावा मंतु[2], दिलें मीं पराप्रती परिसा " ॥ १ ॥

२९ ओंवी.

ऐसें ऐकतां वर्तमान ॥ चौदावें रत्न काढून ॥
गृहलक्ष्मीचें पूजन ॥ आरंभिलें त्या काळीं ॥ १ ॥

३० श्लोक [ शा. वि. ]

सोन्यानें मढवून जो अजवरी पीतत्व[3] अर्पी जिला ॥
त्यानें निर्दय होउनी निजकरें आरक्त[4] केलें तिला ॥
दृष्टांतीं स्फुरला प्रसंग मजला, जोडूनियां नक्तता[5] ॥
जातें वैभव पाहुनी रविहि दे संध्येस आरक्तता ॥ १ ॥

कमळजा ( पतीस ):—

३१ श्लोक [ शिखरिणी. ]

नका मारूं, देत्यें परिस तुमचा आणुनि तुम्हा ॥
पुढें ही नांदूं द्या परत सदनीं येउनि रमा ॥
न होऊं द्या लोकीं क्षणभरिहि छीःथू परि कदा ॥
करा माया आतां म्हणुनि करित्यें वंदन पदा ॥ १ ॥

३२ ओंवी.

परिसाभागवताची कामिनी ॥ येऊन नामदेवाच्या सदनीं ॥
म्हणे त्या राजाई लागुनी ॥ सटवे ! परिस दे आमचा ॥ १ ॥

राजाई ( कमळजेस ):—

३३ पद [ चाल—अरसिक कि० ]

काय कथूं मी तुजला, चुकलें न सुचे कांहीं मजला ॥ ध्रु० ॥
अनुभव ज्याचा दिसला, तो परिस पतीनें फेंकुनि दिधला ॥ १ ॥
कर्मगतीचा फिरला, जो फेरा अजुनिंहि न दिसे सरला ॥ २ ॥

---

१ ऐका. २ अपराध. ३ पिंवळेपणा. ४ तांबडेपणा. ५ रात्र.

## ३४ श्लोक [ मंदाक्रांता. ]

येतां गेहीं रडत अबला वृत्त सांगे पतीला ॥
सीमा नाहीं खचित उरली नाथ! मद्‌दुर्गतीला ॥
कापट्यानें परिस तुमचा चोरिला नामदेवें ॥
*न्यावे कर्में, सहज घडतें, जें दिलें रत्न दैवें ॥ १ ॥

परिसाभागवत ( नामदेवास ):—

## ३५ झंपा.

कुठें नामदेवा! परिस सांग आधीं, भ्रष्ट झाली तुझी काय बुद्धी ॥ ध्रु० ॥
दैवहीना! तुझें संतपण केवढें, ढोंग दावुनि सदा टाळ कुटिसी ॥
उठविली म्हणासि मृत धेनु हरिकीर्तनीं, मूर्ख ते नुमजती गोष्ट साधी ॥१॥
जरि न देसी खळा! परिस माझा मला, निश्चयें मी तुझा प्राण घेतों ॥
करुनि किंवा स्वयें आत्महत्या जलिं, चंद्रभागेंत घेतों समाधी ॥ २ ॥

नामदेव ( परिसाभागवतास ):—

## ३६ श्लोक [ शा. वि. ]

घेसी प्राण वृथाच आज जरि तूं चिंता न त्याची मला ॥
माझी वृत्तिच पांडुरंग भजनें आहे सदा निर्मला ॥
वाटे दुःख परंतु एक करिसी तूं आत्महत्या जरी ॥
तेणें तत्क्षणिं अंतरेल मजला माझा सखा श्रीहरी ॥ १ ॥

## ३७ दिंडी.

प्राण आपण होऊन नको त्यागूं ॥ चंद्रभागेला चाल परिस मागूं ॥
करो! विठ्ठल निःशंक तुझ्या चित्ता ॥ भेट करुनी परिसास झणीं आतां ॥१॥

## ३८ ओंवी.

उभयतां तेथून सत्वरी ॥ आले चंद्रभागेच्या तीरीं ॥
सिकता घेऊन आपुले करीं ॥ नामदेव त्यातें बोलला ॥ १ ॥

---

* दैव देतें, कर्म नेतें. १ वाळू.

नामदेव ( परिसाभागवतास ):—

### ३९ साकी.

ने आतां निःशंकपणानें निवडुनि निज परिसाला ॥
क्षमा करावी या दासास्तव बहु त्रास तुज झाला ॥
परिसाभागवता ! परिस एकदां ‘ भागवता ’

### ४० श्लोक [ पृथ्वी. ]

करांत सिकताकणां परिसरूप पाहूनियां ॥
म्हणे स्वमनिं विस्मयें, ‘ श्रमुं कशास शोधूनियां ॥
जेंडा परिस जो करी, मग मलाच जीवा कसा ॥
बघेल शरणागता कसुनि लावुनीयां कसां ? ॥ १ ॥

परिसाभागवत ( नामदेवास ):—

### ४१ पद [ चाल—जरि वरुनि ध्रु० ]

तुजपाहु कसुनि तरि कसा ? लावुनी कसां, जरि मजपुढें ॥
दिससि तोकसा, तरि तूं हंसचि मी काकसा ॥ १ ॥
तूं धोध करुनियां मना, अन्य कामना, भजसी नित ॥
केशव वामना मजला गांजित धन-कामना ॥ २ ॥
ही विनति एक तव पदा, अविद्याऽपदां, नाशुनी ॥
दाखवि मज त्या पदां, लोळते जेथ मुक्तिसंपदा ॥ ३ ॥

### ४२ दिंडी.

शिष्यभावें साष्टांग नमस्कारी ॥ उलट त्यातें तैं नामदेव वारी ॥
‘ विप्र असुनी कां करिसि वंदनातें ? ॥ पूज्यभावाचें असे तुझें नातें ॥ १ ॥

परिसाभागवत ( नामदेवास ):—

### ४३ श्लोक [ शा. वि. ]

विप्राचा जरि देह, चित्त परि हें चांडाल शूद्राहुनी ॥
देहें शूद्र असूनि निर्मल असें त्वच्चित्त विप्राहुनी ॥

---

१ श्रीमद्भागवताला. २ निर्जिवाला. ३ कसोटीला. ४ अर्भकासारखा. ५ धासना किंवा व्यवसाय. ६ अज्ञानरूपी दैन्य. ७ स्थानास. ८ प्रतिबंध करी.

यासाठीं मज वंद्य सद्गुरु बुधा ! आहेस कीं संप्रति ॥
ब्रह्मालाहि अपूज्यता, प्रणति त्या वाराह विष्णुप्रती ॥ १ ॥

४४ ओंवी.

ऐसा पहावया चमत्कार ॥ असंख्य जमले नारीनर ॥
प्रेमें करिती जयजयकार ॥ श्रीसंत नामदेवाचा ॥ १ ॥

४५ आर्या [ गीति. ]

त्यजुनि प्रपंच आले, शरण तया सर्व जातिबांधव ते ॥
' मन ओढाळ गुरूं हें, ' म्हणति, ' कशानेंहि कां न बांधवतें ? ॥१॥

नामदेव ( जातिबांधवांस ):—

१९ पद [ चाल--तोरा दावि, तराना. ]

जरि सुजनहो ! प्रबळ हें अतिशय मन ॥ अनयोद्भवा सकल विभवा । नितपर वनितादिक विषयांप्रति गणुनि । वमन ॥ ज० ॥ ध्रु० ॥ हरिभजनें, गुणकथनें, संस्मरणें, भवतरणें, इंद्रियगण मग अविरत तदनुग । होइल वश म्हणिं वडुनि दमन ॥ १ ॥ संसृति-भयें त्यजुनि सदना । हरिभजनाविण केंवि वडे भव-दुःख शमन ॥ २ ॥

परिसाभावत ( नामदेवास ):—

४७ आर्या [ गीति. ]

तूं परिस, भागवत तूं, आहे लोकांत नामधारक मी ॥
मग मानूं सांग कसा, सद्गुरुपेक्षां तवाधिकार कमी ? ॥ १ ॥

नामदेव ( परिसाभागवतास ):—

४८ दिंडी.

विप्र पावन सर्वदा धरादेव ॥ नामधारक मी मात्र नामदेव ॥
काय वर्णूं मी तुझी थोर सत्ता ॥ देव बाळगितो हृदयीं विप्र—लत्ता ॥ १ ॥

---

१ आतां. २ अन्यायानें प्राप्त झालेल्या. ३ द्रव्यास. ४ सदोदित. ५ त्याच्या अनरोधानें वागणारा. ६ संसार. ७ नांवाचा. ८ हरिनामाचे धारक- धारण करणारे. ९ भृगूची लाथ विष्णु हृदयावर बाळगितो.

[library stamp]

परिसाभागवत ( नामदेवास ):—

## ४९ चामर.

सद्गुरु स्वरूप तूंच, मीहि शिष्य लेंकरूं ॥
उद्धरीं मला उगाच वंचना नको करूं ॥
दिव्यदृष्टि ही तुझी तशीच येउं दे[१] नेता ॥
मुक्त जो तुला करी, निवेदि देव कोणता ? ॥ १ ॥

नामदेव ( परिसाभागवतास ):—

## ५० पद. [ चाल—तोंवरि तळमळे ]

जेव्हां हरि वळला, हरि वळला, तेव्हां सद्गुरु कळला ॥ ध्रु० ॥
गोरोबादिक संतजनांचा, आत्मा बहु कळवळला ॥
सगुण हरीचा भक्तिमार्ग तो, तत्क्षणिं मजला फळला ॥ १ ॥
दिव्यदृष्टिही प्राप्त व्हावया, तोंचें मनीं हळहळला ॥
खेचरं[३]-पद तें धरितां फेरा, जन्म मृत्युचा टळला ॥ २ ॥

## ५१ ओंवी.

परिसाभागवतासह्हित ॥ नामदेव आला औंढ्यांत ॥
नागनाथाचें मंदिरांत ॥ प्रेमें कीर्तन मांडिलें[४] ॥ १ ॥

नामदेव:—

## ५२ पद ( चाल—जरी कुणा श्री० )

दिव्य चरित ऐका प्रेमें पार्वतीवराचें ॥
देव दैत्य मंथन करिती क्षीरसागराचें ॥ ध्रु० ॥
सर्प रज्जु मंदरं[६]रवीची योजना करोनी ॥
काढुनियां रत्नें चवदा त्यांतुनी तयांनीं ॥
घेतलीं त्रयोदश[७] तेव्हां त्या सुरांसुरांनीं ॥
राहिलें ' हलाहल ' शेखीं रत्न तें गरांचें[८] ॥ १ ॥
आत्मबलें जाळूं पाहे यदा त्रिभुवनाला ॥
प्राण-भयें संकट पडलें सर्व मानवांला ॥

---

१ शरणागताला. २ श्रीपांडुरंग. ३ विसोबा खेचर. ४ निरूपण कथाभाग. ५ वासुकी. ६ मंदराचल. ७ तेरा. ८ विषाचें

प्राशिलें शिवानें तेव्हां त्या हलाहलाला ॥
धैर्य लोक-कल्याणाचें श्रेष्ठ शंकराचें ॥ २ ॥

५३ श्लोक. [ मंदाक्रांता. ]

वर्णी ऐसे शिवगण यदा कीर्तनीं नामदेव ॥
श्रोते झाले समरस सुखें डोलला शंभुदेव ॥
आलें तेव्हां सहज परि तें विघ्न मध्यंतरींच ॥
त्यातें आतां करिल भजनें दूर तो श्रीहरीच ॥ १ ॥

५४ कटिबंध.

हरि कथा, धरुनि सर्वथा, भक्तिच्या पथा, जेधवां चाले ॥
अभिषेक कराया विप्र तेधवां आले ॥ ध्रु० ॥
नेसली विप्र मंडळी, धुवट सोंवळीं, खोवुनी सोगे ॥
अंगावरि हिरवी शालहि फडकूं लागे ॥ १ ॥
रुद्राक्ष, तसे भद्राक्ष, देति जे साक्ष, शैव दीक्षेची ॥
काढिली दुशाल्यावरी मालिका त्यांची ॥ २ ॥
जे नित्य, पुजा-साहित्य, तेंहि शिवभृत्य, घेउनी, वाचें ॥
'शिव शंकर शंकर' गर्जति नाम शिवाचें ॥ ३ ॥
साजिरें, भस्म पांढरें, लाविलें पुरें, भव्य निजभाळीं ॥
तैं 'हरहर' म्हणुनी वाजविती कर टाळी ॥ ४ ॥
(चाल) परि नामदेव त्यायोगें, तेधवां ॥
पाहिना वळुनियां मागें, तेधवां ॥
तल्लीन कथेच्या रंगें, तेधवां ॥
(चा. पू.) खवळुनी, वदति कोपुनी, वाटतें मनीं, रुद्र घोषानें ॥
अर्पिला तमोगुण त्यांस पार्वतीशानें ॥ ५ ॥

विप्र ( नामदेवास ):—

५५ दिंडी.

चाल मूढा हो टाळकुट्या ! दूर ॥ पुरे आतां हा तुझा भक्तिपूर ॥
स्पर्श झाला तरि पुन्हां तुझ्या नांवें ॥ जळीं आम्हां लागेल मग बुडावें ॥ १ ॥

---

१ तल्लीन. २ सेवक-शैव. ३ ब्राह्मणांस. ४ शंकरानें. ५ स्नान करावें लागेल.

263C

नामदेव ( विप्रांस ):--

### ५६ पद. [चाल—मन परदेशी.]

करूं प्रेमभावें हरि-कीर्तनाला ।। ध्रु० ।।
' श्रवण करुनि हरि-गुण मग कीर्तनिं दूर करा मोहाला ' ।।
श्रीमद्भागवतीं हा केला, व्यासें बोध मनाला ।। १ ।।
मुख्य नामसंकीर्तन कलियुगीं सुलभमार्ग सकलांला ।।
मग करितां प्रतिबंध कसा हा, भूदेवांनों! याला[1] ।। २ ।।

विप्र ( नामदेवास ):—

### ५७-५८ ओंव्या.

बोपदेवकृत ' भागवत ' ।। तेंचि म्हणसी व्यासकृत ।।
मूर्खा! ज्ञान नसूनि किंचित ।। डौल मिरविसी भक्तीचा ।। १ ।।
महत्त्व ' शिवपुराण ' ग्रंथा ।। व्यासोंचि वर्णिली ती कथा ।।
येर ते प्रक्षिप्त[2] सर्वथा ।। भलत्या पंथा स्थापिती ।। २ ।।

नामदेव ( विप्रांस ):—

### ५९ श्लोक [ मालिनी. ]

अहह! करूं नका हा व्यास-वाणींत भेद ।।
स्वहित करुनि घ्याया त्यांत माना अभेद ।।
सगुण भजनरंगीं तुच्छ मुख्यापवर्ग[3] ।।
म्हणुनि गणुं नका हो! गौण हा भक्तिमार्ग ।। १ ।।

विप्र ( नामदेवास ):—

### ६० पद [ चाल—हा काय० ]

तूं शूद्र तुला हें योग्य ठेवणें विप्र-पदीं माथा ।। ध्रु० ।।
उलट असा उपदेश करिसि कां ? कथुनी फोल कथा ।।
भ्रष्ट अशा भक्तिपथा, वर्णुं नको येथ वृथा ।।
पथ सोड, नातरि बसतील मूढा! व्यर्थ शिरीं लाथा ।। १ ।।

---

१ नामसंकीर्तनाला. २ मागाहून घुसडलेले. ३ मोक्ष, सायुज्य.

परिसाभागवत ( विप्रांस ):—

### ६१ श्लोक.

छळुं नका आजि भागवतोत्तमा ॥ करिल शंकर कोप तशी उमा ॥
अनुभवें करितों पदिं याचना ॥ धरुं नका स्वमनीं छल-भावना ॥१॥

विप्र ( परिसाभागवतास ):—

### ६२ आर्या [ गीति. ]

परिसा भागवता ! तूं अरि मूढा ! ब्रह्मबीज नसशील ॥
तरि शूद्र-पक्ष घेउनि, शब्द मुखें यापुढेंहि वदशील ! ॥ १ ॥

नामदेव [ परिसाभागवतास ]:—

### ६३ पद [ चाल—मित्रा मम. [

घे परिसा भागवता ! पदरिं पामरा ॥
विनति तुला हीच असे जोडुनी करां ॥ ध्रु० ॥
'ब्राह्मण भूवरि मदीय पूज्य देवता' ॥
देवांचा देव असें बोलला स्वतां ॥
यद्रोषें अंतरेल हरिहि तत्वतां ॥
रुष्ट होऊं देउं नको ! वर्णशेखरा ॥ १ ॥

### ६३ अ. श्लोक [ शा. वि. ]

जीव—द्वेष कसा असे मुळिंच तो स्वप्नीं न ठावा जया ॥
जाति—द्वेषाचि उद्भवेल कुठुनी तैं नामदेवा तया ? ॥
'मागें जावुनि उर्वरीत कथितों महात्म्य आतां पुरें' ॥
केला विप्र गणां प्रणाम विनयें बोलून नम्रस्वरें ॥ १ ॥

### ६४ अभंग.

जातिबांधवांच्या पाहुनी साहसा ॥ रुष्टला परिसाभागवत ॥ १ ॥
हळहळ त्याच्या वाटतसे चित्तीं ॥ परि मनीं भीति सद्गुरुची ॥ २ ॥
आपण होऊन थोर अधःपात ॥ विप्र करितात आपलाचि ॥ ३ ॥

---

१ 'ब्राम्हणो मम देवता.' २ भूदेवांना. ३ उरलेलें चरित्र. ४ धैर्यास नव्हे धार्ष्ट्यास. ५ नामदेवाची.

काय पांडुरंगा स्वहित नेणती ॥ 'शैव' म्हणविती आपणांतें ॥ ४ ॥
यापरि मनांत बाळगीत खंति ॥ अवधान श्रोतीं पुढें द्यावें ॥ ५ ॥

### ६५ दिंडी.

राउळाच्या जाऊनि तदा मागें ॥ पूर्ण कीर्तन त्यास्थळीं करूं लागे ॥
जनहि बसले श्रवणार्थ आदरानें ॥ 'हलाहल ते ग्राशिलें शंकरानें ॥१॥

नामदेव ( निरूपण पुढें ):—

### ६६ पद. [ चाल—जरी कुणा. ]

ग्राशिलें हलाहल तेव्हां देहिं दाह झाला ॥
यत्न फार केलें त्याला शांत व्हावयाला ॥
जान्हवीस मस्तकिं धरिलें चंद्रमाहि भाला[1] ॥
रामनाम जपतां गेलें दुःख शरीराचें ॥
दिव्य चरित ऐका प्रेमें पार्वतीवराचें,[2] ॥ १ ॥

### ६७ चामर.

रंग येइ कीर्तनास भंग जाहला जरी ॥
दंग होय तें शिवातरंग राउळांतरीं ॥
ढंग पूजनांतले अनंगदाह पाहतां ॥
अंग राउळासवें[3] प्रसंगिं तो वळे स्वतां ॥ १ ॥

### ६८ ओंवी.

नामदेवें नेत्र उघाडिलें ॥ सन्मुख शिवास पाहिलें ॥
साष्टांग प्रणिपातें वंदिलें ॥ चित्तीं आनंद मावेना ॥ १ ॥

### ६९ आर्या. [ गीति. ]

प्रगट तदा शिव झाला, 'माग' म्हणे 'वर असे प्रसन्न तुला ॥
सद्भक्त नामदेवा ! त्वद्भक्ति प्रेम त्या कुठें न तुळे[4] ' ॥ १ ॥

नामदेव ( शंकरास ): —

### ७० पद—[ चाल—दत्ता मजला प्र० ]

जय जय जय शिव शंकर शंभो ! स्वामि ! नागनाथा ! ॥
दे मजला वरदान एवढें पदिं नमितों माथा ॥ ध्रु० ॥

---

१ कपाळाला. २ शंकर. ३ देऊळासह स्वतः. ४ तुलना.

त्वत्सन्मुख हरि कीर्तनिं रंगुनि मन्मानस गेलें ॥
येउनि मध्यंतरिं विप्रांनीं ओर विघ्न केलें ॥ १ ॥
पृष्ठभागिं तव येउनि पुनरपि कीर्तन चालविलें ॥
ऐकाया त्वां राउळ फिरवुनि नवलचि दाखविलें ॥ २ ॥
कुणिहि नामसंकीर्तनिं घेइल या पुढती शंका ॥
गर्जत राहो! त्वद्ब्रीदाचा तत्कर्णीं डंका ॥ ३ ॥
कितिहि भागवत-धर्म-बाध्याया विघ्न जरी आलें ॥
साक्ष म्हणुनि तूं असें राहुं दे मंदिर फिरलेलें ॥ ४ ॥

शंकर ( नामदेवास ):—

### ७१ श्लोक.

वर असा दिधला अजि हा तुला ॥ करिन पूरित मी तव हेतुला ॥
तवचि कीर्तन पावन जंतुला ॥ म्हणुनियां क्षमितों द्विज-मंतुला ॥१॥

### ७२ साकी.

हरिहर-भक्तीं भेद निमाला राउळ गरगर फिरतां ॥
पश्चात्तापें ब्राह्मण सारे दंभ त्यजुनी परता ॥
आले शरण तया, वंदन करिती तैं पायां ॥ १ ॥

नामदेव ( विप्रांस ):—

### ७३ श्लोक ( पृथ्वी. )

मला प्रणतपामरा प्रणति ही न आतां करा ॥
अतर्क्य हरि-भक्तिचें स्वमनिं वेड या शंकरा ॥
सदाशिवचि अग्रणी खचित विष्णु-भक्तांत हा ॥
विठूहि धरितो शिरीं; म्हणुनि, पंढरीला पहा ॥ १ ॥

### ७४ ओंवी.

समाधीचा येतां दिन ॥ श्रीपांडुरंगा लागुन ॥
नामदेव हृदयानिवेदन ॥ करूं लागला प्रेमानें ॥ १ ॥

---

१ पूर्ण. २ ब्राह्मणांकडून घडलेल्या महदपराधाला. ३ विठूनें शिरीं वाहिला देवराणा । तया अंतरीं ध्यास रे त्यास नेणा ॥ श्रीसमर्थ.

नामदेव ( देवास ):—

७५ पद. [ चाल—नृपममता. ]

दे निरोप मजला आतां, घननीळा ! रुक्मिणिकांता ! विठ्ठला ॥ध्रु०॥
जी झाली तिळभर सेवा, ती गोड करुनि घे देवा ! विठ्ठला ! ॥
मम अभंगमय सेवेचा संकल्पहि शतकोटीचा राहिला ॥
श्रीधरा ! तुझ्या अंतरा, येइ तंव पुरा करावा तोहि ॥
वासना राहिली नाहीं, मग दुजी ॥ १ ॥
ही पंचभुतांची काया परि पडो ! नेमक्या ठायां विठ्ठला ! ॥
नित घडो ! संतचरणाचा, तिजलागीं स्पर्श सुखाचा ' विठ्ठला ! ॥
ही करी, याचना पुरी, तुला श्रीहरि ! प्रार्थना अंतीं ॥
ती मान्य करी निजचित्तीं विठ्ठला ! ॥ २ ॥

देव ( नामदेवास ):—

७६ श्लोक [ शा. वि. ]

आहे मारुति हा तसा गरुड हा बाजूस त्यां सारुनी ॥
देतों स्थान तुलाच सन्मुख सदा चिंता तुझी वारुनी ॥
ज्यांनीं आजवरी छळूनि तुजला संत्रस्त केलें; तरी ॥
त्यांचे वंशज वंदितील विनयें प्रेमें तुझी पायरी ॥ १ ॥

उत्तरखंड संपूर्ण.

मराठी ग्रंथ संग्रहालय
नं.
ता.
ठाणे.

मराठी ग्रंथ संग्रहालय
नं. ४६२०

## श्रीसंत नामदेवाची

# आरती.

जयदेव जयदेव जय नामदेवा ! ॥
आरति ओवाळूं तुज करुनी मति-सेवा ॥ ध्रु० ॥
गोमाता वाधिली जंव येउनि भूपानें ॥
आळविलें श्रीहरिला कीर्तनरूपानें ॥
उठविलें मृत-धेनु तदा हरि-नाम-जपानें ॥
केलें तुष्ट सभेला मधु गोरस-पानें ॥ १ ॥
निष्काम प्रेमाचें फळ तुजला फळलें ॥
तुजसाठीं श्रीहरिचें मन बहु हळहळलें ॥
खेचर सद्गुरुचें पद जेव्हां आढळलें ॥
'विश्वीं विठ्ठल' तत्त्वहि निर्गुण हें कळलें ॥ २ ॥
परिसाभागवता त्वां दिधलें जागृतिला ॥
मंदिर फिरवुनि विस्मित केलें द्विज-मतिला ॥
गाउनि लीला करितों संतत संस्तुतिला ॥
देवीदासा द्यावें निज गुण-संगतिला ॥ ३ ॥
॥ जयदेव० ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय
क्र. २०३८
मराठी ग्रंथ संग्रहालय
REFBK-0002838

# वारकरी लोकांकरितां संग्राह्य ग्रंथ.

| | | |
|---|---|---|
| १ | श्रीज्ञानदेवाची गाथा ( पॉकेट साइज ) | २—०—० |
| १ | श्रीतुकारामाची गाथा ( ,, ) | छापत आहे. |
| १ | श्रीतुकारामाची गाथा ( मोठा साइज ) | ३—०—० |
| १ | श्रीनिळोबाच्या गाथा | १—०—० |
| १ | गाथापंचक. | १०—०—० |
| १ | दासबोध ( गुटका. ) | १—८—० |
| १ | दासबोध ( देव ) | २—८—० |
| | [illegible]सबोध सार्थ पांगारकर | ४—०—० |
| १ | भक्तिमणिमाला ( ,, ) | १—८—० |
| १ | हरिपाठ पंचरत्नमाला | ०—१—६ |


रावजी श्रीधर गोंधळेकर,
यांचा बुक-डेपो, बुधवार पुणें शहर.

# श्रीसंत दासगणु महाराजांचा

## अभिप्राय.

“ येथील देवीदास लक्ष्मण नांवाचे गृहस्थ सुशिक्षित आहेत. त्यांनीं एक नामदेव चरित्राचे भाग उत्तम लिहिले आहेत. त्यांपैकीं मीं एक पाहिला. किर्तन करण्यास हें साहित्य फार चांगलें आहे असें मला वाटते. शिवाय हें साग्र चरित्र आहे, तेव्हां याचा नामदेव समाजानें उपयोग केल्यास चांगलें होईल.”

वर्गणीदार व्हा! वर्गणीदार व्हा!!

नामदेवसमाजोन्नति परिषदेच्या कार्यास मदत करणारें,

लेखनद्वारा नामदेवसमाजांत सुविचारांचा ओघ

उत्पन्न करणारें.

# संत नामदेव

वा० वर्गणी ट. ह. सह मनिऑर्डरीनें १॥१२,

व्ही. पी. नें. १॥१४.

पत्ताः—संत नामदेव कार्यालय,

खांडकेचाळ नं. २ दादर मुंबई नं. १४.